सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | रविवार, २९ डिसेंबर २०२४ | वर्ष दुसरे | अंक २७५ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com



**छत्रपती संभाजीनगर** – पांडे आयर्न ॲण्ड ट्रेडींग कं., शहा स्टील ट्रेडर्स, रॉयल ट्रेडर्स, वाय.के.ट्रेडर्स, **नारेगाव** – एन.के.ट्रेडर्स, **हर्सुल** – सुरेश ट्रेडर्स अँड हार्डवेअर, **बेरीबाग** – सारा ट्रेडर्स, **सावंगी** – अंजनी ट्रेडर्स, **पिसादेवी** – देवदत्त ट्रेडर्स, **शेंद्रा एमआयडीसी** – निशांत ट्रेडर्स, **करमाड** – साई बिल्डींग मटेरिअल ॲण्ड सप्लायर्स, **आडुळ** – शिवकृपा ट्रेडर्स, **वाळुजगाव** – चंद्रपुष्प इंटरप्राईजेस, **पडेगाव** – कमलेश ट्रेडींग कं, **वैजापूर** – राजाराम स्टील ट्रेडर्स, **लोणी**– बाबा ट्रेडर्स, **देवगाव रंगारी** – मराठवाडा ट्रेडर्स, **खंडाळा** – रविराज ॲग्रो एजन्सीज, **गंगापूर** – हरिओम ट्रेडर्स, **लासूर स्टेशन** – साई ट्रेडिंग कंपनी (मढीकर), **लिंबेजळगाव** – श्री.विठ्ठल कृपा ट्रेडर्स, **महालगाव** – महालक्ष्मी स्टील ट्रेडर्स, **शिऊर बंगला** – जलाल ट्रेडर्स, **पैठण** – संजय ट्रेडर्स, **बिडकीन** – मानधने स्टील ट्रेडर्स, **वासडी** – संतोष ट्रेडर्स, **पिशोर** – रेणुका ट्रेडर्स, **सिल्लोड** – सहारा ट्रेडर्स, **गोळेगाव** – सागर ट्रेडर्स, **उंडणगाव** – श्री.गणेश ट्रेडर्स, **अंधारी** – विशाल ट्रेडर्स, **आळंद** – गजानन ट्रेडर्स, **फुलंब्री** – गजानन ट्रेडर्स, शिव ट्रेडर्स, **पाल फाटा** – योगराज ट्रेडींग कंपनी, श्री.जगदंबा स्टील ट्रेडर्स, **बोरगाव गणपती** – संजय हार्डवेअर, **सुलतानपूर** – लक्ष्मी मशिनरी स्टोअर्स, **कन्नड** – मोरया ट्रेडर्स, **विहामांडवा** – वर्धमान हार्डवेअर ॲण्ड मशिनरी, **शिऊर** – विठ्ठल ट्रेडर्स, **औराळा** – बालाजी ट्रेडर्स, **पाणपोईफाटा** – भगवती स्टील, **पाचोड** – श्रीनाथ ट्रेडर्स ॲण्ड हार्डवेअर, **चितेगाव** – दुर्गा स्टील ट्रेडर्स.

आयकॉन स्टील
टीएमटी बार

## फरार आरोपींची संपत्ती जप्त करण्याचे मुख्यमंत्र्यांचे सीआयडीला आदेश

# सरपंच संतोष देशमुख हत्याप्रकरणी बीडमध्ये महाआक्रोश मोर्चा

### धनंजय मुंडेंचा राजीनामा घेण्यावर एकमुखी मागणी

तभा वृत्तसेवा

बीड दि.२८ डिसेंबर : सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येच्या निषेधार्थ शनिवार दि.२८ रोजी बीडमध्ये सर्वपक्षीय आक्रोश मोर्चा काढण्यात आला. सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर अनेक गंभीर आरोप झाले.या मोर्चाला लोकांनी मोठी गर्दी केली होती. राज्यातील अनेक मोठे नेते या मोर्चात सहभागी झाले होते. संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर लोकांमध्ये मोठा संताप बघायला मिळतो आहे.

बीड शहरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवादन करून मोर्चा सुरूवात झाली. हा मोर्चा माळीवेस, सुभाष रोड, अण्णाभाऊ साठे चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक मार्गे जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकला. येथे सभेत रूपांतर होऊन अनेक मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त करीत मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकारी यांना दिले. आंदोलनांमध्ये मोठा रोष दिसून आला. डोक्याला काळ्या पट्ट्या आणि हातात संतोष देशमुख यांचे बॅनर घेऊन लोक मोर्चात सहभागी झाले होते.सर्वांची एकच मागणी होती ती फरार आरोपींना अटक करून फाशी द्या.आक्रोश मोर्चाच्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी मोठा बंदोबस्त ठेवला होता. वाल्मिक कराड यांच्या पत्नी यांची शुक्रवारी सीआयडीकडून दोन तास चौकशी करण्यात आली. संतोष देशमुख यांच्या हत्येला आता २० दिवस पूर्ण झाली आहेत. आरोपींच्या अटकेसाठी आणि संतोष देशमुख यांना न्याय मिळून देण्यासाठी शनिवारी बीडमध्ये मोर्चा काढण्यात आला.

जिल्ह्यामध्ये संतोष देशमुख हत्या प्रकरणावरून सामान्य स्तरातून वातावरण ढवळून निघाल्याने राजकीय, सामाजिक, धार्मिक क्षेत्रात काम करणाऱ्या सर्व जात विरहीत संघटना व आठरा पगड जातीचे नागरिक स्वयंस्फूर्तीने या मोर्चामध्ये सहभागी झाले होते. काहींकडून या मोर्चाला जातीय रंग देण्याचा प्रयत्न केला जात होता. मात्र तशी परिस्थिती नसून ज्या पध्दतीने क्रुरपणे एका सरपंचाची हत्या करण्यात आली. त्या संदर्भात प्रचंड आक्रोश व्यक्त करण्यासाठी जनसमुदाय स्वयंस्फुर्तीने रस्त्यावर उतरला होता. यामध्ये सत्ताधारी विरोधी पक्षाचे लोकप्रतिनिधी सहभागी होते. मात्र त्यांच्या पेक्षाही सामान्य जनता क्रोधाने सहभागी होती. हा मोर्चा पाहता कोणत्या एका जातीच्या लोकप्रतिनिधीला टार्गेट करण्याचा संबंध दिसत नव्हता. विरोध होता तर तो त्या प्रवृत्तीला ज्यानी सत्तेचा उन्माद दाखवत व गैरवापर करत निष्ठुरपणे एकाची हत्या घडवून आणली. या प्रवृत्तीविरोधात हा आक्रोश होता. यापुढे जिल्ह्यात अशा प्रकारे कोणत्याच राजकारण्याच्या आश्रयाने अशा प्रकारचे दुष्यकृत्य घडू नये अशीच भावना यामध्ये दिसून येत होती. ज्यावेळी हा मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकला त्यावेळी सहभागी विविध लोकप्रतिनिधींनी आपल्या प्रखर भावना व्यक्त केल्या. यामध्ये प्रामुख्याने जिल्ह्याचे खा.बजरंग सोनवणे, राष्ट्रवादी अजित पवार गटाचे आ.प्रकाश सोळंके, भाजपा आमदार सुरेश धस, भाजपा आमदार अभिमन्यू पवार, राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आ.संदिप क्षीरसागर, मनोज जरांगे पाटील, छत्रपती संभाजी राजे यांचा सहभाग होता. यांनी आपल्या भावना व्यक्त करतांना जिल्ह्यात निर्माण झालेल्या कायदा आणि सुव्यवस्थेवर प्रखर टिका करून या सर्व बाबींना मंत्री धनंजय मुंडे हे जबाबदार आहेत. यासाठी सरकारने धनंजय मुंडे यांचा तातडीने राजीनामा घ्यावा अन्यथा मंत्री धनंजय मुंडे यांचे निकटवर्तीय वाल्मिक कराड यांना पोलिसात हजर करावे अशा मागणीचा टाहो फोडण्यात आला. जर धनंजय मुंडे यांचा राजीनामा घेतला नाही तर २ तारखेपासून प्रखर आंदोलन करण्यात येणार असल्याचा इशाराही देण्यात आला. दरम्यान या प्रकरणी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणातील फरार तीन आरोपी यांची संपत्ती जप्त करावी असे आदेश सीआयडीचे प्रमुख बोरूडे यांना दिले आहेत. जर आरोपी पोलिसांना शरण येत नाहीत, किंवा सापडत नाहीत त्यांची संपत्ती जप्त करावी.त्याच बरोबर जिल्ह्यामध्ये नियमबाह्य बंदुकीचा वापर करणारे ज्यांचे फोटो आहेत त्यांची चौकशी करून परवाना रद्द करण्यासाठी कारवाई करावी असे आदेश जिल्हा पोलिस अधीक्षक नवनीत कॉवत यांना दिले आहेत. एकंदरच या मोर्चावरून एकच बाब स्पष्ट होते चुकीच्या पध्दतीने एखाद्याची अमानुषपणे हत्या केल्यानंतर जनतेमध्ये किती प्रक्षोभ निर्माण होतो हे यावरून दिसून आले. या मोर्चामध्ये जात पात धर्म या बाबी कुठेच दिसत नव्हत्या. मोर्चा अतिशय शांततेत झाला. पोलिस प्रशासनही या बाबतीत अतिशय दक्ष होते.





### पंकूताई तुमचे चुकले तुम्ही देशमुख कुटूंबियांची भेट घ्यायला पाहिजे होती

यावेळी भाजपाचे आमदार सुरेश धस यांनी मंत्री पंकजा मुंडे यांच्यावर टीका करतांना म्हटले की, १२ डिसेंबर रोजी तुम्ही जिल्ह्यात होतात. तुमच्याकडून अपेक्षा होती तुम्ही देशमुख कुटूंबियांची भेट घ्यावी मात्र तुम्ही ती भेट टाळली असा उल्लेख मोर्चासमोर आपल्या भावना व्यक्त करतांना आमदार सुरेश धस यांनी व्यक्त केल्या.

## उपायुक्त बाळासाहेब भापकर यांचा नागरिक सन्मान



तभा वृत्तसेवा

कन्नड :- दि.२८ डिसेंबर – राज्य गुप्तवार्ता उपायुक्त बाळासाहेब भापकर यांचा कन्नड तालुक्यातील जनतेच्या वतीने भव्य नागरिक सत्कार दि२८ रोजी संपन्न झाला

कन्नड शहर पोलिस स्टेशन येथे पोलिस निरीक्षक असलेले बाळासाहेब भापकर यांची पदोन्नती राज्य गुप्त वार्ता येथे उपायुक्त पदी नियुक्ती झाल्याने कन्नड तालुक्यातील प्रतिष्ठित नागरिक,डॉक्टर, वकिल,पत्रकार, राजकीय पदाधिकारी, नेते , सामान्य नागरिक यांच्या वतीने हा नागरिक सत्कार सोहळा शहरातील खासगी मंगल कार्यालयात दि.२८ रोजी सायंकाळी ०६:३० वाजता साजरा करण्यात आला,

यावेळी उपस्थित कृषिभूषण डॉ.सीताराम जाधव,उपविभागीय पोलिस अधिकारी विजयकुमार ठाकुरवाड, पोलिस निरीक्षक आर.वी.सानप, सहाय्यक पोलिस निरीक्षक ग्रामीण डॉ. रामचंद्र पवार,सहाय्यक पोलिस निरीक्षक कुणाल सूर्यवंशी, पोलिस उपनिरीक्षक चांद मेंढके, सहाय्यक फौजदार सलिम शहा, डॉ.आनंद मोतींगे, राजेश भारुका, वकिल कृष्णा जाधव, वकिल संघाचे अध्यक्ष उमेश वारे, माजी नगराध्यक्ष संतोष कोल्हे, माजी उपनगराध्यक्ष जावेद शेट, माजी नगरसेवक अहेमद अली, सुलतान भायजी, माजी नगरसेवक काकासाहेब कवडे, डॉ.सदाशिव पाटील, शिवाजी थेटे, सह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते

## जम्मू-काश्मीरमध्ये हिमवृष्टीत अडकलेल्या पर्यटकांची लष्कराने केली सुटका

### गुलमर्गमध्ये कडाक्याच्या थंडीत लष्कराने केली मदत

श्रीनगर : जम्मू-काश्मीरच्या गुलमर्ग येथे हिमवृष्टीत अडकलेल्या पर्यटकांची भारतीय सैन्याच्या जवानांनी सुटका केली. भारतीय लष्कराने गुलमर्ग जिल्ह्यात अडकलेल्या पर्यटकांना बाहेर काढण्यासाठी प्रशासनाच्या आवाहनाला प्रतिसाद दिल्याची माहिती ‘चिनार कॉर्प्स’ने आज, शनिवारी दिली. दरम्यान, हवामान विभागाने जम्मू आणि काश्मीरमध्ये ३० डिसेंबरपर्यंत हलका पाऊस आणि हिमवृष्टीचा अंदाज वर्तवला आहे.

नवीन वर्षाच्या स्वागतासाठी देशभरातील पर्यटनस्थळांवर प्रचंड गर्दी होत आहे. जम्मू-काश्मीरमधील गुलमर्गमध्ये तुफान हिमवृष्टी होत आहे. तनमर्गचा रस्ता बंद झाल्याने सुमारे १३७ पर्यटक अडकले होते. प्रशासनाने सैन्याला मदतीचे आवाहन केल्यावर लष्कराचे जवान तत्काळ मदतीला धावले. त्यांनी पर्यटकांना सुरक्षित स्थळी हलवले आहे. दरम्यान, शुक्रवारी जम्मू-काश्मीर खोऱ्यातील हंगामातील पहिल्या हिमवर्षावानंतर जम्मू आणि काश्मीरच्या अनंतनागमधील काझीगुंड शहरात सुमारे २ हजार वाहने अडकली असल्याची माहिती शुक्रवारी जम्मू-काश्मीरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी दिली.

चिनार कॉर्प्सने आपल्या ट्विटर (एक्स) पोस्टमध्ये सांगितले की, गुलमर्गच्या पर्यटन स्थळी तुफान हिमवृष्टी झाली. त्यामुळे तनमर्गचा रस्ता बंद झाला होता. अडकलेल्या पर्यटकांना बाहेर काढण्यासाठी नागरी प्रशासनाने आवाहन केले. त्यानुसार १३७ पर्यटकांची सुटका करण्यात आली. यामध्ये ८ बालकांचाही समावेश आहे. तसेच कुलगाम जिल्ह्यात भारतीय लष्कराच्या चिनार कॉर्प्सने प्रचंड हिमवृष्टीदरम्यान एका गर्भवती महिलेला रुग्णालयात दाखले केले.

## जेजुरीतील सोमवती यात्रेदरम्यान वाहतुकीत मोठे बदल!

पुणे : बहुजन समाजाचा लोकदेव असणाऱ्या जेजुरीच्या खंडोबा देवाची येत्या सोमवारी सोमवती यात्रा भरणार आहे. ३० डिसेंबर रोजी सोमवती अमावास्येनिमित्त भरणाऱ्या यात्रेच्या निमित्ताने दुपारी १ वाजता खंडोबा देवाच्या पालखी सोहळ्याचे गडावरून प्रस्थान केले जाणार आहे. या यात्रेदरम्यान भाविकांची नेहमीच मोठी गर्दी पाहायला मिळते. अशावेळी वाहतूक कोंडी होऊ नये तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावा यासाठी वाहतुकीत बदल करण्यात आले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, सोमवार ३० डिसेंबर रोजी पहाटे ५ वाजल्यापासून ते रात्री १२ वाजेपर्यंत वाहतुकीमध्ये बदल करण्यात आले आहे. सोमवती अमावस्या यात्रेकरीता येणारी हलकी आणि इतर वाहने वगळून जड-अवजड वाहतूक बंद करुन अन्य पर्यायी मार्गाने वळविण्यात येणार आहे. यामध्ये सातारा, लोणंद, फलटण, बारामती येथून पुण्यात येणारी जेजुरी सासवड मार्गे वाहतूक बंद ठेवली जाणार आहे.






## संक्षिप्त वृत्त...

### पूर्णेत दोन अनोळखी व्यक्तींचे मृतदेह आढळले

**परभणी,/प्रतिनिधी :** पूर्णा शहरातील महावीर नगर व रेल्वेस्थानकालगत एका युवकासह वयोवृध्द महिलेचा मृतदेह आढळून आला. गुरुवार २६ डिसेंबर रोजी म्हणजे एकाच दिवशी दोन अनोळखी व्यक्तींचे मृतदेह आढळून आल्याने पूर्णा पोलिसांनी या मृतदेहाची ओळख पटविण्याचे काम सुरु केले.

महावीर नगरातील एका जूनाट पडीक विहीरीजवळ एका अनोळखी युवकाचा मृतदेह आढळून आला. तर रेल्वे स्थानकावरील प्लॅटफॉर्म क्रमांक चारवरील उपहारगृहाजवळ वयोवृध्द महिलेचा मृतदेह आढळून आला. रेल्वे पोलिसांनी त्याा वयोवृध्द महिलेचा तर स्थानिक पोलिसांनी महावीर नगरातील सापडलेल्या त्याा मृतदेहाची ओळख पटविण्याचा प्रयत सुरु केला. अंदाजे २५ ते २६ वर्षाचा तो युवक असावा, त्यााच्या अंगावर लाल रंगाचा शर्ट, काळी जिन्स पॅन्ट असा पोषाख आहे. तर रेल्वे प्लॅटफॉर्मवर सापडलेल्या वयोवृध्द महिलेचे अंदाजे ७५ वय असावे, असा अंदाज रेल्वे पोलिसांनी व्यक्त केला.

### दुचाकीस्वाराचा ट्रॉलीवर आदळल्याने मृत्यू

**परभणी,/प्रतिनिधी :** पोखर्णी ते पाथरी या रस्त्याावर वडगाव शिवारात रस्त्याावर उभ्या असणाऱ्या ऊसाच्या ट्रॉलीवर जावून आदळल्याने एका दुचाकीस्वाराचा दुर्देवी मृत्याू झाला. गुरुवारी रात्री ९ वाजेच्या सुमारास ही घटना घडली.

वडगाव शिवारातून संग्राम सुदामराव साबळे हा युवक दुचाकीवरुन पोखर्णीहुन पाथरीकडे जात होता. त्याावेळेस त्याास रस्त्याावरील उभी ऊसाची ट्रॉली दिसून न आल्याने तो ट्रॉलीवर जावून आदळला. तेव्हा त्यााच्या डोक्यास व गळ्यास जब्बर मार लागला. त्त्याा त्यााचा जागीच मृत्याू झाला. रात्री ७ वाजेच्या सुमारास ही घटना घडली. दैठणा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली व मृतदेह ताब्यात घेतला. दरम्यान, ऊस वाहून नेणाऱ्या ट्रॅक्टरसह ट्रॉलीस ट्रॅक्टर चालकाने व मालकाने रेडिअम लावले नव्हते, त्याामळे या मोटारसायकलस्वारास रस्त्याावर उभ्या त्याा ट्रॉलीचा अंदाज आला नसावा, असे दैठणा पोलिसांनी म्हटले आहे.

### दोन वाहनांच्या धडकेत दोघे जखमी

**परभणी,/प्रतिनिधी :** परभणी ते गंगाखेड या महामार्गावर नव्याने उभारलेल्या टोल नाक्याजवळ गुरुवारी दुपारी साडेतीन वाजेच्या सुमारास स्विफ्ट डिझायर कार व बोलेरो पिकअप व्हॅन या वाहनांत धडक झाली त्त्याा दोघेजण जखमी झाले. एम.एच.८४ ए. ८०५१ ही स्विफ्ट डिझायर व एम.एच.४३ बी.बी. १७४५ हे बोलेरो पिकअप वाहन एकमेकांवर आदळले. त्त्याा दोघे जखमी झाले. कारमध्ये चालकासह एकूण ५ जण होते.

### जय श्रीराम गोशाळेला १४० गाई व ११ लाखांची मदत

**सोनपेठ,/प्रतिनिधी :** तालुक्यातील सायखेडा येथील जय श्रीराम गोशाळेला बुधवार दि.२५ डिसेंबर रोजी लातूर येथील उद्योजक तथा गोमाताभक्त निलेश ठक्कर यांनी तब्बल १४० गाई व रोख ११ लाख रुपयांची मदत केली.

गोमाताभक्त ठक्कर यांनी गो शाळेला १४० गाईं व देणगी स्वरुपात रोख ११ लाख रुपये मदतीचा संकल्प सोडला होता. त्यााप्रमाणे १४० गाई पाच लाख रुपये रोख व उर्वरित रक्कमेचा धनादेश काका महाराज कदम यांच्याकडे छोटेखानी कार्यक्रमांमध्ये सुपूर्द केला. या कार्यासाठी श्याम मुंदडा यांचे मोलाचे सहकार्य लाभले. याप्रसंगी रामप्रसाद बाहेती, हनुमान कासट, ओमप्रकाश हेड्डा, बजरंग मुंदडा, मनोज शर्मा उपस्थित होते. यावेळी ठक्कर यांनी दान केलेल्या गोमातेसह रोख रकमेबद्दल संचालक कदम यांनी आभार व्यक्त केले. तसेच गो शाळेसाठी परिसरासह राज्यातील गोमाताभक्तांनी समोर येण्याचे आवाहनही केले.

दरम्यान, मागील ८ वर्षापूर्वी काका महाराज कदम यांनी जय श्रीराम गोशाळा सुरू केली. या गोशाळेला विविध भागांमधून गोमाता भक्तांकडून यापूर्वी चारा गोडाऊन, गायींसाठी तीन निवारा शेड, कुंपण, पाण्याच्या व्यवस्थेकरीता मदतीचा हात मिळाला. गोशाळेत रंगनाथ महाराज प्रतिष्ठान, वारकरी संप्रदायातील भक्तगण व इतर सेवाभावी संस्था यांच्या वतीने नेहमीच विविध उपक्रम यशस्वीरीत्याा राबविल्या गेले आहेत. या परिसरात भक्तांकडून श्रीकृष्णाचे मंदिर उभारण्यात आले आहे.

### बालरंगभूमी संमेलनात पोखर्णीच्या बालकलावंतांची धमाल 'कचऱ्याचे भूत' या बालनाट्याचे सादरीकरण : शाळेच्या वतीने सत्कार

**परभणी,/प्रतिनिधी :** पुणे येथे झालेल्या बालरंगभूमी संमेलनामध्ये पोखर्णीच्या (ता.परभणी) बालकालावंतांनी 'कचऱ्याचे भूत' हे बालनाट्य सादर करून धमाल उडवून दिली.

पुणे येथे झालेल्या या संमेलनाचे अध्यक्ष ज्येष्ठ अभिनेते मोहन जोशी होते. आयोजक बालारंगभूमी परिषदेच्या अध्यक्षा नीलम शिर्के- सामंत व चित्रपट व नाट्य क्षेत्रातील दिग्गज मंडळी या तीन दिवसीय संमेलनात सहभागी झाले होते. या संमेलनात बालरंगभूमी परिषद शाखा परभणीच्या वतीने नृसिंह माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या बालनाट्याची निवड झाली होती. या नाट्यात संस्कृती संतोष पुजारी, उत्कर्षा मारोतराव वाघ, पंकजा वाघ, कोमल साहेब भुमरे, नम्रता नागेश वाघ, अंजली बालासाहेब वाघ, श्रद्धा दत्ता वाघमारे, सोनाक्षी शेषराव वाघ, आरुषी भागवत वाघ, भक्ती ज्ञानोबा वाघमारे, अंकिता रामभाऊ वाघ, वैष्णवी कोंडीबा कदम, कोमल सुतारे यांच्यासह दिग्दर्शक त्र्यांबक वडसकर, संघ प्रमुख शैलेश ढगे, रामप्रसाद अवचार, कुलदीप उंडाळकर यांचा समावेश होता.

### मरडसगाव फाट्यावर धडकेत एकाचा मृत्यू

**गंगाखेड,/प्रतिनिधी :** तालुक्यातील मरडसगाव फाट्यावर गुरुवार २६ डिसेंबर रोजी पहाटे अज्ञात वाहनाने दिलेल्या धडकेत एका ग्रामस्थाचा मृत्याू झाला. गोपिनाथ रंगनाथराव शिंदे (वय ४५) हे पहाटे साडेपाच वाजता दुध काढण्याकरीता शेताकडे दुचाकीवरुन निघाले होते. त्याावेळी अज्ञात वाहनाने शिंदे यांच्या मोटारसायकलला जोरदार धडक दिली. त्या ते गंभीर जखमी झाले. कुटूंबियांनी गंगाखेड येथील उपजिल्हा रुग्णालयात उपचारार्थ दाखल केले.

तरुण भारत
कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी
❑ दैनिक ❑ वेबसाईट ❑ सोशल मिडिया
छोट्या जाहीराती व प्रगटनासाठी
खरेदी-विक्री-प्रॉपर्टी व वाहन/भाडेपट्टी/नोकरी विषयक/प्रवेश/ विवाह विषयक/ शैक्षणिक/ आरोग्य/ ड्रायव्हिंग स्कूल/ मोबाईल/ हॉटेल/ रेस्टॉरंट/ आईस्क्रिम पार्लर/ मसाज पार्लर/ ब्युटी पार्लर/ कागदपत्रे हरवले/ चेंज ऑफ नेम/ न्यायालयीन व धर्मादाय आयुक्त कार्यालय प्रगटने/

# अटलजींमुळे माहिती तंत्रज्ञान, दूरसंचार आणि दळणवळण क्षेत्रात भारत परिपूर्ण- आ.डॉ.गुट्टे



**गंगाखेड,/प्रतिनिधी:-** लोकसंख्येच्या बाबतीत आघाडीवर असलेल्या भारत देशाला विविध क्षेत्रात उंची गाठून देण्याचा अटलजींना कायम प्रयत केला. त्याांच्या प्रमुख नेतृत्वााखाली तत्कालीन एनडीए सरकारने सामान्य नागरिकांसाठी तंत्रज्ञान सुलभ करण्याचा यशस्वी प्रयत केला. कारण, त्याांच्याकडे दूरदृष्टी होती.

आजही भारतीयांना अटलजींची दैदिप्यमान कामगिरी आठवते. सुवर्ण चतुर्भुज प्रकल्प आणि पंतप्रधान ग्राम सडक योजना सारख्या उपक्रमांद्वारे स्थानिक कनेक्टिव्हिटी वाढली. तसेच त्याांच्या सरकारने दिल्ली मट्रोसाठी व्यापक काम करून मेट्रो कनेक्टिव्हिटीला चालना दिली. तो जागतिक दर्जाचा पायाभूत सुविधा प्रकल्प आहे. त्याामुळे अटलजींमुळे माहिती तंत्रज्ञान, दूरसंचार आणि दळणवळण क्षेत्रात भारत परिपूर्ण झाला आहे, असे प्रतिपादन स्थानिक आ.डॉ.रताकर गुट्टे यांनी केले. देशाचे माजी पंतप्रधान भारतरत स्व.अटलबिहारी वाजपेयी यांच्या जंयती निमित्त तालुक्यातील मौजे.मालेवाडी येथील आश्रम शाळेत आयोजित अभिवादन कार्यक्रमात ते बोलत होते. याप्रसंगी अनेक शिक्षक व विद्यार्थ्यांनी स्व.वाजपेयीजींच्या आठवणी जागवल्या. महापुरुष जयंती समिती व सकल बंजारा समाजाने या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. पुढे बोलताना आ.डॉ.गुट्टे म्हणाले की, लोकशाहीला समृद्ध करून संकेतांचे मापदंड निर्माण करणारे व्यक्ती म्हणून अटलजींची भारतीय राजकारणात ओळख होती. श्यामाप्रसाद मुखर्जींच्या नेतृत्वााखाली नव्याने जन्मास आलेल्या जनसंघाला लोकमान्यता मिळवून देण्याचे कार्य अटलजींनी केले. राष्ट्रीय पक्ष म्हणून काँग्रेसचा ऱ्हास होत असतानाच त्यााची जागा घेईल असा पर्यायी राष्ट्रीय पक्ष भारतीय राजकारणात निर्माण करणे ही त्याांची सर्वांत मोठी ऐतिहासिक कामगिरी ठरली. जनसंघापासून भारतीय जनता पार्टीचा प्रदीर्घ प्रवास अनेक चढ उतारांनी भरलेला आहे. जनता पक्षातून बाहेर पडून भारतीय जनता पार्टी ह्या रूपाने पुनःश्च हरी ओम हा धाडसी प्रयोग होता. तेव्हाच्या त्याा निवडणुकीत त्याा नवीन पक्षाचा दारुण पराभव झाला. केवळ दोन सदस्य निवडून आले. खुद्द वाजपेयींना पराभव स्वीकारावा लागला. अशा पराभवाने भले-भले खचून जातात.

## जिंतूरातील बलसा येथे महसूल विभागाकडून ई-पीक पाहणी



**जिंतूर,/प्रतिनिधी:** तालुक्यातील बलसा येथे महसूल विभागातर्फे शेतकऱ्यांच्या ई पीक पाहणीचे नोंद करण्यासाठी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन ई पीक पाहण्याची नोंदणी करण्यात आली.

परभणी जिल्हाधिकारी यांच्या आदेशानुसार जिल्ह्यात दोन दिवसीय म्हणजे दिनांक २८ व २९ डिसेंबर ई पिक पाहणी चे विशेष मोहीम राबविण्यात आली त्याा अंतर्गत मौजे बलसा येथे ग्राम महसूल अधिकारी एस पी झिंगे, आर बी शिंदे,एम आर लासे यांनी शेतकऱ्यांना ई पीक पाहणी चे नोंदणी करण्यासाठी तसेच जनजागृती करण्यासाठी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले यात शेतकरी प्रा. डॉ. प्रभाकर वजीर, वीरू कुमार सावजी कळमकर, संदीप वजीर, अनिल वजीर, काशिनाथ शिंदे, मुंजाभाऊ डोंबे, विठ्ठलराव शिंदे, राजू नवले, मुकुंद ठोंबरे, रामदास ईलग, रामा ठोंबरे, विठ्ठल लाखाडे, ज्ञानेश्वर अंभुरे, लिंबाजी ईलग, संभाजी ईलग यांचेसह बलसा येथील शेतकरी उपस्थित होते.

## ज्ञानसाधना प्रतिष्ठानमध्ये आयुष्याची पाठशाळा वार्षिक स्नेह संमेलन कार्यक्रम उत्साहात संपन्न

**परभणी,/प्रतिनिधी-** आयुष्याची पाठशाळा वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न मांडाखळी-ज्ञानसाधना प्रतिष्ठान संचलित, इंद्रायणी किड्स किंगडम, इंद्रायणी प्राथमिक व माध्यमिक विद्यालय, संताई कनिष्ठ महाविद्यालय मांडाखळी, ता.जि. परभणी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आयुष्याची पाठशाळा वार्षिक स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते.

याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. प्रा. किरण सोनटक्के अध्यक्ष, ज्ञानसाधना प्रतिष्ठान परभणी, उद्घाटक मा.श्री प्रल्हाद खुणे, वरिष्ठ अधिव्याख्याता, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था परभणी, प्रमुख पाहुणे मा.श्री श्रीकांत डोंगरे, पीआय ग्रामीण पोलीस स्टेशन, परभणी, मा.श्री अशोक जायभाये पीआय, पोलीस स्टेशन दैठणा, डॉ. संज्योत गिरी, डॉ. गोविंद पावडे, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, परभणी, मा. श्री विकास कुकडे मा. श्री वैभव बाचकर नवनियुक्त शिक्षणाधिकारी याबरोबरच वार्षिक स्नेहसंमेलनाच्या स्वागताध्यक्षा मा. प्रा, शितल सोनटक्के, सचिव, ज्ञानसाधना प्रतिष्ठान, श्री नागेश शिराळ सरपंच, मांडाखळी श्री शेख मोहसीन उपसरपंच, मांडाखळी श्री शिवराज नाना सोनटक्के, श्री प्रवीण सोनटक्के इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

सदर शाळा, कनिष्ठ महाविद्यालयात मांडाखळी पंचक्रोशीतील ३३ गावांमधून वर्ग नर्सरी ते बारावीपर्यंत तब्बल बाराशे विद्यार्थी शिक्षण घेतात, शाळेतील प्रत्योक विद्यार्थ्याने व्यासपीठावर येऊन आपल्या सुप्त कलागुणांना संधी दिलीच पाहिजे हा संस्थेचा प्रयत असतो.या दोन दिवसीय वार्षिक स्नेहसंमेलनात पहिला दिवस आयुष्याची पाठशाळा या थीमवर आधारित व्यक्तीच्या जन्मापासून ते मृत्यूपर्यंत विविध कौटुंबिक व सामाजिक स्तरावर वेगवेगळे नातेसंबंध कशी निर्माण होतात व ती कशी निभावल्या जातात हे ६०० विद्यार्थ्यांनी २७ मराठी व हिंदी गीतांवर सुंदर नृत्या आविष्कार सादर करून व्यक्त केले. तर दुसरा दिवस मैत्री या थीमवर आधारित आपण आयुष्यभर प्रत्योक वयोगटासार मैत्रीचे नाते बिनधास्तपणे निभावत असतो हे ६०० विद्यार्थ्यांनी २७ नृत्या अविष्कार सादर करीत व्यक्त केले. विद्यार्थ्यां सोबत संस्थेचे अध्यक्ष व सचिव यांनी सर्व स्टाफ सोबत नृत्या अविष्कार सादर करीत हम साथ साथ है चा संदेश दिला. संगीत शिक्षक श्री बळीराम कौसाईतकर व सूत्रसंचालक श्री रामेश्वर कच्छवे यांच्या सुरसागर गीत संचाने विविध गीत सादर करून उपस्थितांचे मने जिंकली. कार्यक्रमास २००० पेक्षा अधिक पालकांची उपस्थिती लाभली. सदर स्नेहसंमेलनाचे औचित्या साधत श्री धनंजय कुलकर्णी मांडाखळीकर यांच्या वतीने वर्ग दहावी प्रथम कु. वेदिका सुधीर ढोले, मंगरूळ वर्ग बारावी कला प्रथम रूपाली एकनाथ हराळे, बाबुळगाव व विज्ञान शाखेतून प्रथम कु. रेश्मा अजीम शेख, डफवाडी या विद्यार्थ्यांना अकराशे रुपये रोख रक्कम, शाल व पुष्पहार देऊन पालकासह सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार दरवर्षी दिल्या जाणार आहे.

## श्रीकालिकादेवी वार्षिकोत्सव विविध उपक्रमांनी साजरा



**सेलू,/प्रतिनिधी:** सेलू येथील श्री कालिकादेवी मंदिरात देवीचा वार्षिकोत्सव शुक्रवार २७ डिसेंबर रोजी विविध कार्यक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला.

सकाळी आठ वाजता अभिषेक व महापूजा झाली. दुपारी बारा वाजता महाआरती व महाप्रसाद झाला. यानिमित्ताने आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सेलू कालिकादेवी संस्थानचे अध्यक्ष अशोक कासार हे होते. याप्रंसगी माजी आमदार हरिभाऊ लहाने, माजी नगराध्यक्ष विनोद बोराडे, कासार समाज मध्यवर्ती मंडळाचे अध्यक्ष शरदराव भांडेकर, आळंदी येथील ज्ञानेश्वरी पारायण फंडाचे अध्यक्ष अरूणराव वेळापूरे, शंकरराव हेलसकर, गोपाळराव सासवडे, माजी उपनगराध्यक्ष प्रभाकर सुरवसे, शिवराज आंदोले, डॉ. श्रीकांत दहिभाते यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी बोलतांना माजी नगराध्यक्ष बोराडे म्हणाले, की श्री कालिकादेवी मंदिर व सेवाभावी संस्थेच्या वतीने सातत्या ठेवून राबविण्यात येणारे विविध सामाजिक, अध्यात्मिक उपक्रम स्त्त्युाा आहेत. माजी आमदार लहाने यांनी मंदिर परिसरात सोयी-सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी विविध सरकारी योजनेतून भरीव आर्थिक साहाय्य मिळवून देण्याची ग्वाही दिली. भांडेकर म्हणाले, की कसबा मतदारसंघाचे आमदार हेमंत रासने यांच्या रूपाने कासार समाजाला एक हक्काचा आमदार मिळाला आहे. त्याांच्या माध्यमातून तसेच विविध पक्षाच्या लोकप्रतिनिधींच्या सहकार्याने कासार समाजाच्या उन्नतीसाठी सर्वांनी एकजूटीने प्रयत करू, असे सागंतिले. यावेळी राजश्री व अनंतकुमार विश्वंभर, सेवेकरी लक्ष्मण शेटे, बालाजी वानरे, माधव वानरे, चंद्रकांत सासवडे, धोंडीराम ढोके, मुंजा शेटे, शिवाजी शिनगारे, जीवन खरावणे तसेच विविध संस्थानच्या पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक अशोक वानरे यांनी केले. सूत्रसंचालन गजानन हेलसकर यांनी केले तर धर्मकुमार वानरे यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राम प्रसाद वराडे, प्रभाकर खरावणे, सुनीता हेलसकर, अरूण गोरे, बाबासाहेब हेलसकर, गोपाळ नामदेव, मीरा हलगे, अरूण ढोके, शरद खरावणे, नितीन वराडे, पंकज ढोके आदींसह पदाधिकारी, सदस्य व कासार समाज बांधवांनी पुढाकार घेतला.

## इज्जतेमासाठी विशेष बसेसची व्यवस्था करा- एमडिओ

**परभणी,/प्रतिनिधी-** मुस्लिम बांधवांकडून परभणी-हिंगोली या दोन जिल्ह्यांचा जिल्हास्तरीय इज्तेमाचे आयोजन १ व २ जानेवारी रोजी करण्यात आले असून त्यााकरीता राज्य मार्ग परिवहन महामंडळाने विशेष बसेसची व्यवस्था करावी, अशी मागणी मायनॉरिटी डेव्हलपमेंट ऑर्गनायझेशनने केली आहे.

मुस्लिम बांधवांकडून परभणी-हिंगोली या दोन जिल्ह्यांचा जिल्हास्तरीय इज्तेमाचे आयोजन १ व २ जानेवारी रोजी शहरातील जिंतूर रोड उर्दु मदरसा परिसरात करण्यात आले आहे. या इज्तेमाला हजारोंच्या संख्येने मुस्लिम भाविकांची उपस्थिती राहणार आहे. मुस्लिम बांधवांची हजारोंच्या संख्येत होणारी गर्दी लक्षात घेता महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाकडून १ व २ जानेवारी रोजी परभणी - हिंगोली जिल्ह्यातील जिंतूर, सेलू, मानवत, पाथरी, सोनपेठ, पूर्णा, गंगाखेड, पालम, बसमत, औंढा, सेनगाव, कळमनुरी, तालुक्यातील इज्तेमासाठी परभणीकडे येण्यासाठी विशेष बस फेऱ्याची व्यवस्था करावी, तसेच २ जानेवरी रोजी रात्री इज्तेमा समाप्ती नंतर इज्तेमाच्या स्थळापासुन परभणी - हिंगोली जिल्ह्यातील भाविकांना परत जाण्यासाठी तालुकास्तरावर एसटी बसेसची व्यवस्था करावी, अशी मागणी एसटी महामंडळाच्या नियंत्रक विभागाकडे सहाय्यक वाहतूक अधिक्षक एस. आर. औसेकर यांच्याकडे मायनॉरिटी डेव्हलपमेंट ऑर्गनायझेशन संघटनेचे जिल्हाध्यक्ष सय्यद रफीक पेडगावकर, जिल्हा कार्यकारी अध्यक्ष शेख उस्मान शेख इस्माईल शेख शमशोद्दी शेख यामीन पटेल आदींनी केली आहे.

## हवी कन्या एक गोड जगण्याची ओढ वाढविते- सहस्त्र चंद्रदर्शन सोहळ्यात रंगले कविसंमेलन

**मानवत,/प्रतिनिधी-** हवी कन्या एक गोड जगण्याची ओढ वाढविते सहस्त्राचंद्रदर्शन सोहळ्यात रंगले कविसंमेलन

सेलू : प्रसन्नता सुख । घराचा आधार। आहे अलंकार संस्कारांचा।।, म्हणूनच हवी कन्या एक गोड। जगण्याची ओढ। वाढविते।। या सुरेश हिवाळे यांनी सादर केलेल्या अभंगाने रसिक भारावून गेले. पत्रकार श्रीपाद कुलकर्णी यांचे आईवडील इंदुमती आणि भास्करराव कुलकर्णी मसलेकर यांच्या सहस्त्राचंद्रदर्शन सोहळ्या निमित्त शहरातील अक्षदा मंगल कार्यालयाच्या सभागृहात मंगळवार ( दि. २४ ) कवी संमेलन संपन्न झाले. कवी संमेलनाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ कवी गौतम सूर्यवंशी हे होते. कवींनी सादर केलेल्या कवितांनी श्रोत्याांना मंत्रामुग्ध केले. कविता ऐकून कधी चेहऱ्यावर हास्य फुलले, तर कधी डोळ्यात नकळत पाणी तरळले.



गझलकार संजय विटेकर यांनी बोलून टाक कळो ना कळो, पुढे आपले जुळो ना जुळो, आधीच जरा रडून घेतो, नंतर अश्रू ढळो ना ढळो. तर अश्विनी विटेकर यांनी तू जीवना कशाचा बदलाचं घेत आहे, मी मागते सुखाला तू दुःख देत आहे. ही गझल सादर करून रसिकांची दाद मिळवली. मनिषा पांडे यांच्या छोट्या मोठ्या असंख्य रेषा, तळहातावर किती, कुठली नाही मनासारखी, ओंजळ माझी रिती या कवितेने रसिक भारावून गेले. चंद्रकांत कुलकर्णी मसलेकर यांनी कालच महिला दिन झाला, आमच्या ह्यांला अजिबात सवड नव्हती महिला सबलीकरणावर फार छान बोलतात हे, दिवसभर मी ह्यांच्यासोबतच होते. सादर केलेल्या या कवितेने रसिकांना खिळवून ठेवले. करूणा बागले यांनी माझ्या मराठीचा रंग, असे गहिरा गहिरा, ज्ञानेशाच्या ज्ञानाईत, वाहे अमृताचा झरा. ही मराठीची महती सांगणारी कविता सादर केली. तर संध्या फुलपगार यांनी आपल्या काळजाची वेदना, कळवळू लागली , तेव्हा कुठे कविता, दरवळू लागली या कवितेने रसिकांच्या काळजाचा ठाव घेतला. कवी संमेलनाचे अध्यक्ष ज्येष्ठ कवी गौतम सूर्यवंशी यांची आकाशाचा मी कंदील होतो , पणतीसम तूज कवेत घेतो, घेता घेता कवेत तुजला, मीच पुरता उजळून जातो ही कविता श्रोत्याांना भावली. कवी संमेलनास प्राचार्य डॉ. शरद कुलकर्णी, संतोष कुलकर्णी, अतुल दातार, प्रा. प्रकाश कुरूंदकर, प्रा. अनिल कुलकर्णी, दिलीप डासाळकर यांची उपस्थिती होती. कवी संमेलनाचे सुत्रसंचलन डॉ. सुरेश हिवाळे यांनी केले. तर आभार प्रदर्शन श्रीपाद कुलकर्णी मसलेकर यांनी केले.

## अग्रलेख...

# अर्थशास्त्री हरपला...

२०२४ च्या सरत्या वर्षाने जाताजाता देशाला एक मोठा हादरा दिला. ज्येष्ठ काँग्रेस नेते, माजी पंतप्रधान तसेच आंतरराष्ट्रीय ख्यातीचे अर्थतज्ज्ञ डॉ. मनमोहनसिंग यांनी राजधानी दिल्लीतील अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्थेत (एम्स) वयाच्या ९२ व्या वर्षी अखेरचा श्वास घेतला. डॉ. मनमोहनसिंग यांचे निधन अनपेक्षित नसले तरी धक्कादायक निश्चितच म्हणावे लागेल. त्यांच्या निधनाने देशातील आर्थिक सुधारणेचा, तसेच आर्थिक उदारीकरणाचा जनक काळाच्या पडद्याआड गेला आहे. त्यामुळे त्यांच्या निधनाने सामान्य माणूस हळहळला, त्याला वेदना झाल्या. डॉ. मनमोहनसिंग यांच्या निधनाने देशाची अपरिमित अशी हानी झाली, कधीच भरुन न निघणारे नुकसान झाले. डॉ. मनमोहनसिंग यांनी सलग दहा वर्षे देशाचे पंतप्रधानपद भूषवले. २००४ ते २०१४ या काळात संपुआ सरकारचे नेतृत्व त्यांनी केले. पंडित जवाहरलाल नेहरू यांच्यानंतर सलग दहा वर्षे देशाचे पंतप्रधानपद भूषवण्याचा विक्रम त्यांच्या नावावर नोंदला गेला. २०१४ नंतर भाजपाचे नरेंद्र मोदी यांनी हा विक्रम मोडला हा भाग वेगळा. नेहरूंनंतर सर्वाधिक काळ पंतप्रधानपद त्यांच्या कन्या श्रीमती इंदिरा गांधी यांनी सांभाळले होते, पण सलग दहा वर्षांचा विक्रम त्यांनाही करता आला नाही. प्रकृती अस्वास्थ्यामुळे गेल्या काही वर्षांपासून डॉ. मनमोहनसिंग राजकारणातून दूर झाले झाले होते. सार्वजनिक कार्यक्रमातील त्यांचा सहभागही कमी झाला होता. पण मोतीलाल नेहरू मार्गावरील निवासस्थानी त्यांचे वास्तव्य ही आश्वासक बाब होती. घरात एखादा वृद्ध माणूस असल्यावर तो कोणतेही काम करत नसला तरी घरातील सगळ्यांना त्याचा मानसिक आधार असतो, तसा डॉ. मनमोहनसिंग यांचा आधार काँग्रेसला होता. डॉ. मनमोहनसिंग १९९१ मध्ये राजकारणात आले, तेव्हापासून म्हणजे जवळपास ३३ वर्षे ते राजकारणात होते, पण राजकारणात असले तरी ते राजकारणी नव्हते, हे मान्य करावेच लागेल. त्यांचा पिंड हा राजकारण्याचा नव्हता. सर्वसामान्य राजकारण्याची जी प्रतिमा आपल्या देशात आहे, त्याच्या उलट प्रतिमा डॉ. मनमोहनसिंग यांची आहे. सभ्य, सज्जन, सोज्वळ, सात्विक, संयमी, सुशिक्षित, सुसंस्कृत, सऱ्हदयी आणि संवेदनशील असे स च्या बाराखडीतील सर्व सदगुणांचा पुतळा असे त्यांचे वर्णन केले तर अतिशयोक्तपूर्ण होणार आहे. डॉ. मनमोहनसिंग फारसे बोलणारे नव्हते, त्यांच्याजवळ वक्तृत्वाची आणि प्रभावी संभाषणाची कला नव्हती. त्यामुळे विरोधक मौनीबाबा म्हणून त्यांची टिंगलही करत होते. डॉ. मनमोहनसिंग काँग्रेसचे नेते होते, पण काँग्रेसने त्यांना नेहरू गांधी घराण्यासाठी राखीव असलेले पंतप्रधानपद दिले हे मान्य करावे लागेल, पण त्याचवेळी गांधी घराण्याने त्यांच्यावर अन्यायही केला. डॉ. मनमोहनसिंग यांची व्यक्ती म्हणून तसेच पंतप्रधानपद म्हणून प्रतिष्ठा राखली नाही, जपली नाही, हे नाकारता येणार नाही. देशाचे पंतप्रधानपद डॉ. मनमोहनसिंग यांच्याकडे अपघाताने आले, पण या पदाला त्यांनी न्याय दिला. त्यांचे माध्यम सल्लागार संजय बारू यांनी 'द ॲक्सिडेंडल प्राईममिनिस्टर' असे पुस्तक लिहित त्यावर अप्रत्यक्षपणे शिक्कामोर्तब केले होते. पंतप्रधान म्हणून त्यांनी आपल्या कार्यकाळात जे धाडसी निर्णय घेतले, देशाला आर्थिक संकटातून बाहेर काढत प्रगतीच्या आणि विकासाच्या नव्या वाटेवर नेऊन उभे केले, हे नाकारता येणार नाही. डॉ. मनमोहनसिंग पंतप्रधानपदावर असताना त्यांच्या सरकारचा रिमोट कंट्रोल घटनाबाह्य सत्ताकेंद्र अशी प्रतिमा निर्माण झालेल्या श्रीमती सोनिया गांधींकडे होता. पंतप्रधान कार्यालयात आपल्या पसंतीचे अधिकारी नियुक्त करण्याचा त्यांचा अधिकारही सोनिया गांधींनी हिरावून घेतला होता. पण अशाही प्रतिकूल परिस्थितीत डॉ. मनमोहनसिंग यांच्या सरकारने जे काही महत्वपूर्ण निर्णय घेतले, त्याबद्दल त्यांचे संपूर्ण देशाने आभार मानले पाहिजे. खऱ्या हिऱ्याची पारख जोहरीला असते, त्याप्रमाणे अर्थतज्ज्ञ आणि नोकरशहा असलेल्या डॉ. मनमोहनसिंग यांचा १९९१ मध्ये पी. व्ही. नरसिंहराव यांनी आपल्या मंत्रिमंडळात अर्थमंत्री म्हणून समावेश केला. नरसिंहराव यांनी मनमोहनसिंग यांच्याकडे अर्थमंत्री म्हणून जबाबदारी सोपवली नसती तर देशाच्या अर्थव्यवस्थेचे काय झाले असते, याची कल्पनाही करता येत नाही. नरसिंहराव यांनी मनमोहनसिंग यांना अर्थमंत्री करताना आर्थिक आघाडीवर धाडसी निर्णय घेण्याची मोकळीक आणि स्वातंत्र्य दिले होते. अर्थमंत्री म्हणून तुम्ही जे निर्णय घ्याल, ते यशस्वी झाले तर त्याचे श्रेय आपल्या दोघांना मिळेल, मात्र ते फसले तर त्यासाठी जबाबदार फक्त तुम्हीच राहाल, असे नरसिंहराव यांनी तेव्हा म्हटले होते. मात्र तरीसुद्धा त्यांनी देशाच्या आर्थिक हितासाठी काही धाडसी निर्णय घेतले. दुसरा एखादा अर्थमंत्री असता तर त्याने देश गेला खड्ड्यात म्हणत कातडीबचाव निर्णय घेतले असते. डॉ. मनमोहनसिंग यांनी आतापर्यंत वेगवेगळ्या क्षेत्रातील सांभाळलेल्या जबाबदाऱ्या पाहिल्या म्हणजे त्यांचे मोठेपण समजून येते. अर्थमंत्री म्हणून डॉ. मनमोहनसिंग यांनी आपला पहिला अर्थसंकल्प संसदेत मांडला. त्यावर विरोधी पक्षनेते असलेल्या भाजपाचे अटलबिहारी वाजपेयी यांनी टीका केली. त्यामुळे संवेदनशील मनाचे डॉ. मनमोहनसिंग दुखावले गेले, त्यांनी राजीनामा देण्याचा निर्णय घेतला होता. ही बाब पंतप्रधान असलेल्या नरसिंहराव यांना समजताच त्यांनी वाजपेयींना दूरध्वनी करुन याची माहिती दिली. वाजपेयी यांनीही मनाचा मोठेपणा दाखवत डॉ. मनमोहनसिंग यांची भेट घेतली. मी अर्थसंकल्पावर केलेली टिका ही विरोधी पक्षनेता म्हणून राजकीय स्वरुपाची आहे, असे त्यांना सांगितले, आणि तेव्हा कुठे त्यांनी राजीनाम्याचा निर्णय फिरवला. पंतप्रधानपदावर असतानाही डॉ. मनमोहनसिंग यांच्या मनात एकदोनदा राजीनामा देण्याचा विचार आला होतो. डॉ. मनमोहनसिंग पंतप्रधान असताना बाहेर देशात गेले होते, त्यावेळी त्यांच्या सरकारचा एक अध्यादेश तेव्हा नुकतेच खासदार झालेल्या राहुल गांधी यांनी अतिशहाणपणा दाखवत जाहीरपणे फाडून टाकला होता. असे करत एकप्रकारे त्यांनी पंतप्रधान डॉ. मनमोहनसिंग यांचा अपमान केला होता. आज माझे मार्गदर्शक हरपले असे म्हणणारे हेच ते राहुल गांधी आहेत. पंतप्रधान म्हणून डॉ. मनमोहनसिंग यांचा पहिला कार्यकाळ तुलनेत अतिशय चांगला गेला. या काळात त्यांनी सरकारला पाठिंबा असलेल्या डाव्या पक्षांच्या विरोधाला डावलत भारत अमेरिका अणुकरार घडवून आणला. असे करताना त्यांनी आपले पंतप्रधानपदही पणाला लावले होते. डाव्यांनी पाठिंबा काढल्यानंतर समाजवादी पक्षाच्या पाठिंब्यावर आपले सरकार वाचवले होते. पंतप्रधानपदाच्या दुसऱ्या कार्यकाळात डॉ. मनमोहनसिंग यांच्या सरकारवर मंत्रिमंडळातील त्यांच्या सहकाऱ्यांवर भ्रष्टाचाराचे अनेक आरोप झाले. डॉ. मनमोहनसिंग यांच्यावर भ्रष्टाचाराचा आरोप झाला नसला तरी मंत्रिमंडळातील भ्रष्ट सहकाऱ्यांना पाठिशी घातल्याचा, त्यांच्यावर कारवाई न केल्याचा आरोप त्यांच्यावर झाला. त्यांच्या मंत्रिमंडळात असणारे अनेक उद्दाम मंत्री घटनाबाह्य सत्ताकेंद्राच्या पाठिंब्यामुळे पंतप्रधान असलेल्या मनमोहनसिंगांनाही जुमानत नव्हते. मात्र असे असतानाही पंतप्रधानपदाच्या काळात त्यांनी जे काही मोजके निर्णय घेतले, ते अतिशय महत्वाचे आणि देशावर दूरगामी परिणाम करणारे ठरले. वर्षात १०० दिवस रोजगाराची हमी देणारा मनरेगा कायदा, शिक्षणाचा हक्क अधिकार कायदा, शेतकऱ्यांना ६० हजार कोटींच्या कर्जमाफीची योजना असे अनेक निर्णय सांगता येतील. पण पंतप्रधान म्हणून डॉ. मनमोहनसिंग यांच्या कामगिरीचे योग्य मूल्यमापन कधी झालेच नाही, त्यांच्या कर्तृत्वाचा आणि कार्यक्षमतेचा योग्य सन्मान कधी झालाच नाही. पद्म पुरस्कार मालिकेतील कोणत्याही पुरस्काराने त्यांना कधी सन्मानित करण्यात आले नाही. पंतप्रधान म्हणून माझ्या कामगिरीचे मूल्यमापन इतिहासालाच करावे लागेल, असे विधान त्यांना करावे लागले. भारतमातेच्या या सुपुत्राला तरुण भारत परिवाराची विनम्र श्रध्दांजली आणि भावपूर्ण अभिवादन.

---

## यंगिस्तान

**जयेश शत्रुघ्न मेस्त्री**

# हा तर साहित्याचा अपमान!

छद्म पुरोगामी विश्वात सावरकरांविषयी प्रचंड दरारा आहे. खरे सावरकर जर लोकांना कळले तर या स्वयंघोषित पुरोगाम्यांचे दुकान बंद होईल, ही भीती त्यांना वाटत असते. म्हणूनच सावरकरांना नाकारणे किंवा चुकीच्या पद्धतीने किंवा खोटा इतिहास लोकांसमोर ठेवून बुद्धिभेद करणे व सावरकरांचे नाव साहित्य संमेलनातून गाळणे असे प्रकार ते करत असतात. स्वातंत्र्यवीर सावरकर हे देशभक्त होते, क्रांतिकारकांचे मुकुटमणी होते, त्याचप्रमाणे ते उत्तम कलाकार होते, साहित्यिक होते. त्यांचे निबंध केवळ माहितीपर नव्हते तर निबंधातही लालित्य होतं. शंकर वैद्य म्हणायचे की सावरकर हे उत्तम प्रेमकवी आहेत.

*जयोऽस्तु ते श्रीमहन्मंगले ।*
*शिवास्पदे शुभदे स्वतंत्रते भगवती ।*
*त्वामहं यशोयुतां वंदे ।*
किंवा
*अनादि मी अनंत मी, अवध्य मी भला ।*
*मारिल रिपु जगति असा कवण जन्माला ।*
किंवा
*हे हिंदुशक्ति-संभूत-दीप्ततम-तेजा ।*
*हे हिंदुतपस्या-पूत ईश्वरी ओजा ।*
*हे हिंदुश्री-सौभाग्य-भूतिच्या साजा ।*
*हे हिंदु नृसिंहा प्रभो शिवाजीराजा ।*

तरी सुद्धा ते उत्तम प्रेमकवी होते, असं एका मोठ्या साहित्यिकाचं म्हणणं आहे. सावरकरांनी उत्तम प्रेमकविता लिहिली आहे.

*सकाळीच तू तोडित असता जाईजुईच्या फुलां*
*माडीवरूनी सुंदर कन्ये, पाहियलीं मीं तुला*
*उंचविता कर छातीवरि ये चोळी तटतटूनी*
*कुरळ केश रुळताती गोरट्या मानेवरि सुटुनी*

आणि असे असतानाही सावरकरांना साहित्य संमेलनातून मुद्दामून डावललं जातं, त्यांचा अपमान केला जातो. सावरकरांनी साहित्याच्या विविध प्रांगणात मनसोक्त विहार केलेला आहे. ते नाटककार होते, कवी होते, निबंधकार होते, ऐतिहासिक लेखक होते, ललित साहित्यालाही त्यांनी परीस स्पर्श केला होता. इतकंच काय तर माहितीपर लिखाणातही लालित्य



आणण्याचा चमत्कार त्यांनी केला. अंदमानातील यातनांचे, दुःखाचे व अत्याचाराचे वर्णन करणारा 'माझी जन्मठेप' हा ग्रंथ वाचताना आपल्याला कंटाळा येत नाही. सावरकरांच्या भाषेवर दुर्बोध असा शिक्का लावण्याचा प्रयत्न झाला असला तरी ग्रंथ वाचताना 'पुढे काय होणार?' ही उत्सुकता आपल्याला असते. हे एका महान साहित्यिकाचं लक्षण आहे. मात्र त्यांच्या देशभक्तीचा पगडा इतका आहे की त्यांची साहित्यसंपदा त्यामागे लपून जाते. नव्हे नव्हे, खरे तर ही साहित्यसंपदा लपवून ठेवण्याचे किंवा ती चुकीच्या पद्धतीने लोकांसमोर मांडण्याचे महापाप छद्म पुरोगामी मंडळींनी 'आपले परम दायित्व' या भावनेने केले आहे.

२१, २२ आणि २३ फेब्रुवारी २०२५ रोजी ९७ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन दिल्लीत होणार आहे. या संमेलनाच्या आयोजनाची जबाबदारी पुण्यातील 'सरहद' या संस्थेकडे आहे. १९ डिसेंबर रोजी आयोजनाविषयी एक पत्रकार परिषद घेण्यात आली होती. त्यावेळी संमेलनाच्या पत्रिकेवर स्वातंत्र्यवीर सावरकरांचे छायाचित्र नव्हते. आयोजकांना याबाबत प्रश्न विचारता संजय नहार म्हणाले, महाराष्ट्रात दोन वैचारिक गट होते - जहाल आणि मवाळ. त्यामुळे पत्रिकेमध्ये मवाळ गटाचे गोपाळकृष्ण गोखले आणि जहाल गटाचे लोकमान्य टिळक यांची छायाचित्रे घेण्यात आली. म्हणूनच जहाल गटाचे सावरकर यांचे छायाचित्र घेतले नाही. असे विचित्र स्पष्टीकरण त्यांनी दिले आहे. मग प्रतिभाताई पाटील यांचे छायाचित्र का लावले? आणि मुळात हे दोन जहाल गट काँग्रेसमध्ये होते. सावरकर हे काँग्रेसचे नेते नव्हते. त्यामुळे असे स्पष्टीकरण देऊन आयोजकांनी वैचारिक बैठकीलाच तिलांजली वाहिली आहे. विशेष म्हणजे यावेळी शरद पवार हे स्वागताध्यक्ष आहेत. याआधीही साहित्य संमेलनात सावरकरांचा अपमान झालेला आहे. २०२० ला उस्मानाबाद येथे झालेल्या साहित्य संमेलनाआधी काँग्रेसच्या सेवा दलाने भोपाळमध्ये प्रशिक्षण शिबिरात सावरकरांबद्दल आक्षेपार्ह लिखाण असलेली पुस्तिका वाटली होती. म्हणून देशप्रेमी मंडळींनी याविरोधात संमेलनामध्ये ठराव करावा अशी मागणी केली होती. मात्र असा ठराव घेतल्यास आम्ही साहित्य संमेलनाचा निषेध करू अशी धमकी काँग्रेसने दिली. २०२१ मध्ये नाशिक येथील संमेलनातही सभामंडपाला सावरकरांचे नाव देण्यास नकार दिला होता. नाशिक हे सावरकरांचे जन्मस्थान. मात्र त्यावेळी छगन भुजबळ हे स्वागताध्यक्ष होते आणि शरद पवार या उद्घाटनाच्या कार्यक्रमाला उपस्थित होते.

स्वा. सावरकरांनी साहित्य जगतात मोलाची कामगिरी केली आहे. मराठी भाषेला नवे शब्द देऊन व जुने शब्द पुनरुज्जीवीत करून मराठी भाषा आणि साहित्य त्यांनी समृद्ध केले आहे. स्वदेशीचा फटका हे पहिले साहित्य सावरकरांनी वयाच्या ११ व्या वर्षी रचले. शेवटच्या श्वासापर्यंत सावरकर साहित्य निर्मिती करत होते. महाकाव्य लिहिण्याचा निश्चयही त्यांनी बालपणीच केला होता. सावरकर हे साहित्य संमेलनाचे अध्यक्ष राहिलेले आहेत. जुन्या प्रथांवर टीका करताना त्यात द्वेषाची भावना नव्हती, तर नव्या युगाचे स्वागत करण्याचे गीत त्यांनी रचले. त्याचबरोबर जे जे पुरोगामी ते ते श्रेष्ठ, असं मानण्याचा करंटेपणा त्यांनी केला नाही. सावरकर म्हणतात, कोणतीही गोष्ट केवळ नवी आहे म्हणूनच ग्राह्य जात्याच ठरत नाही. कोणतेही साहित्य नुसते पुरोगामी आहे म्हणूनच काही सत्य व तथ्य ठरेलंच असे गृहीत धरता येत नाही. म्हणूनच सावरकर साहित्यिकांसाठी पूजनीय व अनुकरणीय आहेत. सावरकरांचे साहित्य मनोरंजक होते, त्याचबरोबर ते राष्ट्राचे हित साधणारे होते. सावरकर लिहितात, साहित्य हे राष्ट्राच्या बुद्धीचे, सामर्थ्याचे, शौर्याचे प्रतीक आहे. सावरकर हे साहित्याचे महर्षी होते. भारतात त्यांच्याशिवाय साहित्य हा शब्द उच्चारणेही पाप ठरू शकते. पण छद्म पुरोगाम्यांची अडचण अशी आहे की सावरकर हे खऱ्या अर्थाने पुरोगामी असून हिंदुत्ववादी होते. हिंदुत्ववादी माणूस पुरोगामी असू शकतो, अशी कल्पनाही छद्म पुरोगाम्यांना करता येत नाही. सावरकरांसारख्या महान साहित्यिकाला डावलून पुढे जाणे, त्यांचे नाव मुद्दामून वगळून साहित्य संमेलन आयोजित करणे हा सावरकरांचाच नव्हे तर साहित्याचाही अपमान आहे!

writerjayeshmestry@gmail.com

---

## वेध

**विजय कुळकर्णी**

# आता उद्धव ठाकरे वाजणारे फोन उचलू लागले!

होय, आता माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे फोन उचलायला लागले, ही मोठी बातमी झाली आहे. कारण, गेल्या पाच वर्षांत उद्धव ठाकरे फोन उचलत नाहीत, अशी त्यांची ख्याती झाली होती. कारण, पाच वर्षांपूर्वी उद्धव ठाकरेंनी एका पत्रकार परिषदेत मोठ्या अभिमानाने सांगितले होते की, होय, देवेंद्र फडणवीसांचा फोन मला वारंवार येत होते. पण, मी ते उचललेच नाहीत. आठवते ना. त्यानंतर त्यांनी काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेससोबत महाविकास आघाडी करून राज्यात सत्ता स्थापन करून ते मुख्यमंत्री झाले होते.

हे वाचकांना नक्कीच आठवत असेल. देवेंद्र फडणवीसांकडे त्यावेळी १०५ आमदार असूनही त्यांना विरोधी पक्षाच्या बाकांवर बसविले होते. हे आज आठवण्याचे कारण म्हणजे, नुकतेच नागपूर येथील हिवाळी अधिवेशन संपले. या अधिवेशनात एक दिवस उद्धव ठाकरे हे देवेंद्र फडणवीस यांना भेटण्यासाठी मुख्यमंत्र्यांच्या दालनात गेल्याची बातमी दूरचित्रवाणीवर पाहिली व वर्तमानपत्रातून देखील वाचली. उद्धव ठाकरे यांनी एका चॅनेलवरून प्रसारित झालेल्या त्यांच्या एका पत्रकार परिषदेत सांगितले की, भुजबळांचा मला फोन आला होता. सध्या राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार छगन भुजबळ कमालीचे नाराज आहेत, हे सर्वांना माहीत आहे. ते जाहीरपणे आपली नाराजी व्यक्त करीत असतात. त्यांनी उद्धव ठाकरेंना फोन करणे यात काही फार मोठे नाही. कारण, कोणत्याही पक्षातील नाराज असलेले नेते हे उद्धव ठाकरेंना



फोन करीत असतात आणि नाराजांना गोळा करण्याचे काम सध्या उद्धव ठाकरे करीत आहेत. यात महत्त्वाची गोष्ट एकच आहे ती म्हणजे आजकाल उद्धव ठाकरे फोन उचलालयला लागले आहेत. कारण, ते मुख्यमंत्री असताना काँग्रेसचे दोन मोठे नेते बाळासाहेब थोरात व त्यावेळी काँग्रेसमध्ये असलेले अशोक चव्हाण यांनी जाहीरपणे सायंकाळी ७-८ वाजेनंतर मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आमचे फोन घेत नसल्याची तक्रार केली होती. या तक्रारीची दखल घेऊन संजय राऊत यांनी कुरकुरणारी खाट या मथळ्याखाली सामनामध्ये अग्रलेख लिहिला होता. अशा वेळी उद्धव ठाकरे पत्रकार परिषदेत मला भुजबळांचा फोन आला होता, असे सांगतात. विशेष म्हणजे त्यांनी तो फोन उचलला, ही बाब महत्त्वाची ठरते. हल्ली मला नाराजांचे फोन येत असल्याचेही त्यांनी या पत्रकार परिषदेत म्हटले होते. अर्थातच नाराज असलेलेच उद्धवजींना फोन करतील ना. जे आपल्या पक्षात खुश आहेत ते कशाला त्यांना फोन करतील. पण, त्यावेळी सत्ताधारी महाविकास आघाडीत असलेले काँग्रेसचे नेते अशोक चव्हाण व बाळासाहेब थोरात यांची तक्रार काय होती, उद्धव ठाकरे आमचा फोन उचलत नाहीत. म्हणजेच ते सत्तेत असूनही नाराजच होते. पण, आता या पत्रकार परिषदेत उद्धव ठाकरे यांनी म्हटले की, भुजबळांचा फोन आला होता. म्हणजे त्यांनी तो उचलला. म्हणजेच आता उद्धव ठाकरे फोन उचलायला लागले ही महत्त्वाची बातमी होते. भुजबळ आणि उद्धव ठाकरे यांच्यात काय संवाद झाला ही बाब तेवढी महत्त्वाची नाही. लोकसभा निवडणुकीदरम्यान काँग्रेसचे नेते राहुल गांधी महाराष्ट्रात येऊन वीर सावरकरांना अपमानास्पद बोलत होते. तेव्हा, वीर सावरकरांचा अपमान आम्ही सहन करणार नाही, असे उद्धव ठाकरेंनी काँग्रेस किंवा राहुल गांधींना कधी खडसावले नाही. आता मात्र ते सावरकरांबद्दल बोलू नका, असे म्हणतात. पण, अपमानास्पद बोलू नका, असे ते बोलत नाहीत. पण, आज उद्धव ठाकरे पुन्हा हिंदुत्वाकडे वळताना आपण आज देखील हिंदुत्वविरोधी कसे आहोत ते दाखविताना भाजपाने नेहरूंविषयी रडगाडे बंद करावे, असे म्हणतात. तर, राहुल गांधी सावरकरांविषयी मधुर गाणी म्हणतात की काय? असो, माणूस आता चुकांची दुरुस्ती करण्याचा प्रयत्न करीत आहे, हेही नसे थोडके. जो माणूस फोनच उचलत नव्हता तो आज फोन उचलायला लागला हा त्यांच्यात झालेला बदल दखलपात्र असा आहे.

८८०६००६१४९

---

## मुंबई वार्तापत्र

**नागेश दाचेवार**

# मद्यधुंद विश्वप्रवक्ते!

दारू डोक्याच्या नसांना धुंद करते, ज्यामुळे मेंदुचा ताबा सुटत जातो. आणि एकदा मेंदू नियंत्रणाबाहेर गेल्यास मानव जो अंतरंगात असतो तो हळूहळू प्रकट होण्यास सुरुवात होते. जर त्याने मागील काळात अपमान, अत्याचार, मानहानी सहन केली असेल तर तो आक्रस्ताळा होतो. जर त्याचा प्रेमभंग झाला असेल तर शायर होईल वा दुःखी होईल. जर तो आतून आनंदी असेल तर त्या वेळेस तो दानशूर होईल, तुमच्यासाठी काहीही करण्यास तयार होईल. जर त्याने तोटा सहन केला असेल तर मग तो चिंतेत दिसेल. कधी कधी स्मृतिभ्रंश देखील होतो. नेमक्या अशाच काहीशा अवस्थेतून आपले विश्वप्रवक्ते जात असल्याचे दिसते. मविआच्या काळात किराणा दुकानात दारू विक्रीचा निर्णय आपल्याच आग्रहाने घेतल्याचा स्मृतिभ्रंश विश्वप्रवक्ते साहेबांना झालाय्... तर, दारू कंपनीत मुलीला भागीदार बनवून नफा कमावण्यात तोटा सहन झाल्याच्या दुःखद परिस्थितीतून ते अद्याप सावरलेले नाहीत. ते सध्या स्मतिभ्रंश आणि तोटा सहन न झाल्याच्या, अशा दोन मद्यधुंद व्यक्तींच्या परिस्थितीतून जात आहेत. त्यामुळेच अजित पवार लाडक्या बहिणींच्या भावांना आणि नवऱ्यांना हे सरकार दारुडे बनवणार असा आरोप ते करु लागले असावेत.

ऐन कोरोना काळात महाविकास आघाडी, अर्थात तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंनी कोरोना संकटावर मात करण्यासाठी लोकोपयोगी निर्णय घेण्याऐवजी, उपायायोजना करण्याऐवजी, त्याकाळात घेतलेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत राज्याच्या दारू धोरणात बदल करण्यास मंजुरी दिली. राज्यात लागू होण्यास तयार असलेल्या या धोरणात काय होतं, तर किराणा दुकान, मॉलमध्ये वाईन विक्रीची परवानगी. तीदेखील साधीसुधी नव्हे, तर, दुकानदाराने शोकेस बनवून विक्री करावी असा फुकटचा सल्ला देखील शासकीय आदेशातून दिला होता. शिवाय मद्यावरील आयात शुल्क कमी करून, दर ३०० टक्क्यांवरून १५० टक्के करून दारू विक्रीला प्रोत्साहन देणारा निर्णय देखील मविआ सरकारने घेतला होता. आणि राज्यात हा निर्णय लागू करण्याची एवढी घाई झाली होती की, मंत्रिमंडळाने निर्णय घेतल्याघेतल्या अध्यादेश काढून अंमलबजाणीसाठी हे मोकळे देखील झाले होते. तेव्हा विरोधात असलेल्या भाजपाने आणि राज्यातील महिलांनी प्रचंड विरोध केल्यानंतर, राज्यातून होणाऱ्या विरोधामुळे हादरलेलं मविआ सरकार अंमलबजाणी करण्याची हिम्मत करू शकले नव्हते. मात्र, कोविड काळात कोरोना प्रतिबंधक उपाययोजना करण्याऐवजी ही नसती उठाठेव मविआ सरकारने का केली असावी? हा प्रश्न पडणे स्वाभाविक आहे. तर, बघा, अशोक गर्ग नावाचे व्यवसायिक २०१० पासून, मॅग्पी डीएफएस प्रायव्हेट लिमिटेड नावाची वाईन वितरण करणारी कंपनी चालवतात. या कंपनीचे नाव आधी ''मादक'' असे होते. या कंपनीत विश्वप्रवक्त्यांच्या दोन मुली विदिता, पूर्वशी आणि त्यांचे पार्टनर सुजित पाटकर हे सगळे १६ एप्रिल २०२१ ला पार्टनर झाले. बस्स, एवढंच पुरेसं आहे, कोरोना काळात मागणी करूनही मंदिरं बंद ठेवून, सगळ्यात पहिले दारू दुकानं उघडायला मंजुरी देणाऱ्या उद्धव ठाकरे ॲण्ड कंपनीचा हा खटाटोप कशासाठी होता, हे कळायला...!

बरं आज भावांना आणि नवऱ्यांना दारुडे बनण्याची चिंता असलेल्या विश्वप्रवक्त्याने त्यावेळी या निर्णयामुळे शेतकऱ्यांना कसा फायदा होणार, तसेच वाईनच्या उत्पादनासाठी वापरण्यात येणाऱ्या शेती उत्पादनाला विक्रिसाठी व्यासपीठ मिळण्यास कशी मदत होणार, द्राक्षे, मोसंबी, संत्रा, ऊस तसेच वाईननिर्मितीसाठी लागणाऱ्या पिकाचे उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यांना या निर्णयाचा कसा फायदा होईल, त्याचबरोबर किराणा दुकानदारांच्या व्यावसायात कशी वाढ होईल, याचे फायदे सांगत किराणा दुकान, मॉलमध्ये दारू विक्रीच्या निर्णयाचे जोदार समर्थन केले होते बरं का...! त्याचवेळी २०१४ मध्ये युती सरकार आल्यानंतर सुधीर मुनगंटीवारांनी चंद्रपूर जिल्ह्यात दारू बंदी केली होती. ती बंदीदेखील ठाकरेंच्या मविआ सरकारने उठविली होती. ही बंदी उठवताना इथल्या बहिणींचे भाऊ आणि नवरे बरं विस्मृतीत गेले होते.

पण आता सरकारी तिजोरीवरचा ताण कमी करण्यासाठी सरकारने नव्याने मद्यविक्रीचे परवाने दिले तर राज्याचे उत्पन्न वाढेल असा केवळ सल्ला अधिकाऱ्यांनी सरकारला दिला आणि आपला दारू धंदा जमीदोस्त झाल्याच्या दुःखातून न सावरलेल्या विश्वप्रवक्त्यांची चांगलीच जळाली. त्यामुळे नेहमीप्रमाणे त्यांनी आकांडतांडव सुरू केले. प्रत्यक्षात हा सल्ला देण्यामागची कारणं काय आहेत? महाराष्ट्रात विदेशी दारू विक्रीचे १७०० परवाने आहेत. महाराष्ट्रात देशी दारू विक्रीचे ३५०० परवाने आहेत. सगळे परवाने १९७२ पूर्वी देण्यात आले आहेत. १९७२ नंतर विदेशी मद्यविक्रीचे परवाने दिलेले नाहीत. जुन्या परवान्यांच्या हस्तांतरासाठी सरकारला एक कोटी रुपये मिळतात. प्रत्यक्षात हस्तांतरण होताना ३०-४० कोटींहून अधिकचे व्यवहार होतात. बीअर शॉपीमध्ये दारू विक्रीला परवानगी दिलेली नाही. अवैध दारू विक्रीमधून लाखो रुपयांचे व्यवहार होतात. या व्यवहारातून सरकारला काहीही महसूल मिळत नाही. म्हणजे राज्यात दारू विक्री मोठ्या प्रमाणावर होते. पण त्या तुलनेत सरकारला महसूल अत्यंत कमी मिळतो. त्यामुळे बीअर शॉपीमधून दारू विक्रीला परवानगी देणे, विदेशी दारू विक्रीचे परवाने वाढवणे या माध्यमातून सरकारला आणखी महसूल मिळू शकतो असे अधिकाऱ्यांचे मत आहे. सध्यातरी सरकारने यावर कुठलाही निर्णय घेतलेला नाही. तरी, दुकानांचे परवाने दिले जाणे आणि दारू दुकानांतच विक्रीचा हा प्रस्ताव आहे. जो किराणा दुकानात दारु विक्री करण्याच्या निर्लज्ज विचारापेक्षा नक्कीच उजवा आहे, असे म्हणता येईल.

आता गंम्मत बघा, अद्याप कुठलाही निर्णय झालेला नसताना, आरोप करायला कोण सरसावलं आहे तर दारू व्यापाऱ्याशी भागीदारी करून, मद्यधोरणात सुधारणा करून व्यापाऱ्याला सरकारकडून लाभ मिळवून देत, स्वतः दलाली खाण्याचा प्रयत्न करणारे. सरकारात असताना उद्धव ठाकरेंनी किराणा दुकानात दारू विक्रीचा निर्णय घेतला, आयात शुल्क कमी करून दारू स्वस्त विकायला निघाले तेव्हा, बहिणींच्या भावांची, नवऱ्यांची, लहान मुला-बाळांची चिंता न वाटणाऱ्या ठाकरे ॲण्ड कंपनी आणि विश्वप्रवक्त्यांच्याबद्दल वाईट आणि चिंता दोन्ही वाटते. कारण गेली पाच वर्षे ते केंद्रात आणि राज्यात सत्ता येण्याच्या निराशेच्या गर्तेतून अद्याप बाहेर पडू न शकल्यामुळे, पुन्हा पाच वर्षे केवळ सकाळी बडबड करता करता मानसिक संतुलन ढळून विश्वप्रवक्ते मद्यधुंद अवस्थेत आढळल्यास आश्चर्य वाटू नये.

९२७०३३३८८६

---

### आधार कार्डचे प्रणेते डॉ. मनमोहन सिंग

आज देशात आणि विदेशात सर्वदूर आपल्या आधार कार्डचा डंका वाजत आहे त्या आधार कार्डची खरी सुरुवात यूपीए सरकार काळात झाली. त्यावेळी देशाचे पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग होते. इन्फोसिसचे सहसंस्थापक नंदन मोहनराव निलेकणी यांनी आधार कार्ड प्रोजेक्टची अध्यक्षता केली होती. भारतात बहुउद्देशीय राष्ट्रीय ओळखपत्र किंवा युनिक आयडेंटिटी कार्ड प्रकल्प राबवण्यासाठीची जबाबदारी त्यावेळचे पंतप्रधान मनमोहन सिंग यांनी त्यांच्याकडे दिली होती. या उपक्रमाचा उद्देश भारतातील सर्व रहिवाशांसाठी एक अद्वितीय ओळख क्रमांक प्रदान करणे आहे आणि कल्याणकारी सेवांच्या कार्यक्षम वितरणासाठी त्याला जोड म्हणून आधार नंबर वापरला जाईल. यामधील ओळख पद्धत ही बायोमेट्रिक आहे. भारतातील लोकसंख्येचा हा सरकारी डेटा बेस तयार करण्याच्या संपूर्ण मोहिमेला जागतिक बँकेचे तेव्हाचे मुख्य अर्थशास्त्रज्ञ पॉल रोमर यांनी आधारला पृथ्वीवरील सर्वांत मोठा सामाजिक प्रकल्प द्वारा असे संबोधण्यात आले होते.

माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांच्या सरकारच्या काळातील सर्वांत उल्लेखनीय कार्य म्हणून आधार कार्डचा उल्लेख नेहमी होत राहणार. आधार कार्डमुळे देशवासीयांच्या आठवणीत ते चिरकाल राहतील.

**अविनाश देशपांडे**/९४२२९५०७५०

●● ●●

### महान अर्थतज्ज्ञ, थोर विचारवंत हरपले

भारताचे माजी पंतप्रधान डॉ मनमोहन सिंग यांचे वयाच्या ९२ व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या निधनाने देशाने एक महान अर्थतज्ज्ञ, थोर विचारवंत आणि व्यासंगी, अभ्यासू व्यक्तिमत्त्व गमावले. भारताची अर्थव्यवस्था आज जगात सर्वांत वेगाने विकसित होणारी अर्थव्यवस्था आहे याचे सर्व श्रेय डॉ. मनमोहन सिंग यांनाच जाते. डॉ मनमोहन सिंग यांनी अर्थमंत्री असताना जे क्रांतिकारक निर्णय घेतले होते त्याचीच फळे आज आपण चाखत आहोत. अर्थमंत्री असताना त्यांनी खाजगीकरण,

## वाचक पत्रे



उदारीकरण आणि जागतिकीकरणाचे धोरण अवलंबले. त्यांच्या याच धोरणामुळे भारतात परदेशी गुंतवणूक वाढली आणि देशाची रसातळाला गेलेली अर्थव्यवस्था सुदृढ झाली. त्यांनी राबवलेली ही धोरणे पुढे जगाने स्वीकारली म्हणूनच त्यांना आर्थिक उदारीकरणाचे जनक असे म्हटले जाते. पंतप्रधान म्हणूनही त्यांची कारकीर्द यशस्वी ठरली. पंतप्रधान असताना त्यांनी देशातील एकही व्यक्ती उपाशी झोपू नये म्हणून अन्न सुरक्षा योजना आणली. त्यांनी आणलेल्या मनरेगा या योजनेमुळे तरुणांना रोजगार मिळाला. पंतप्रधानपदी असताना त्यांनी परराष्ट्राशी सौहार्दाचे संबंध प्रस्थापित केले. त्यांच्याच कारकीर्दीत भारताचे अमेरिकेसोबत मैत्रीचे संबंध प्रस्थापित झाले. दहा वर्ष देशाचे पंतप्रधान राहूनही ते कायम नम्र आणि विनयशील राहिले. अहंकाराचा लवलेशही त्यांना शिवला नाही. त्यांच्या कामाप्रति असलेला व्यासंगी आणि शैक्षणिक दृष्टिकोन, जन सामान्यांसाठी असलेली उपलब्धता व विनम्र आचरणामुळे ते कायम स्मरणात राहतील. त्यांनी देशासाठी जे योगदान दिले ते देश कधीही विसरू शकणार नाही. त्यांच्या निधनाने देशाची खूप मोठी हानी झाली आहे. डॉ. मनमोहन सिंग यांना भावपूर्ण श्रद्धांजली!

**श्याम ठाणेदार**/९९२२५४६२९५

●● ●●

### नववर्षाचा जल्लोष

२५ डिसेंबरपासून सगळीकडे मौजमस्ती करण्याची प्रथा पडत चालली आहे. बहुतांश शाळा, महाविद्यालये यांना हिवाळी सुट्या याच काळात असतात. त्यामुळे सगळ्यांमध्ये उत्साह संचारतो. नोकरदार वर्गाला सुट्या संपवायच्या असतात. त्यामुळे पर्यटनाला उधाण येते. इंग्रजी कॅलेंडरप्रमाणे वर्षाच्या शेवटच्या दिवशी म्हणजेच ३१ डिसेंबरच्या रात्री तर नाच, गाणे, जल्लोष यांना उधाण येते. दिव्यांची रोषणाई करण्यात येते. लोक आनंदाने बेधुंद होतात. आपले नववर्ष गुढीपाडव्याला साजरे होते हे मान्य आहेच. पण व्यावहारिकदृष्ट्या एक जानेवारीपासून नववर्षाची सुरुवात होते. त्यामुळे प्रमाणात एकत्रित येऊन आनंद साजरा करणे वावगे नाही.

पण त्यात वाहवून जाऊ नये. इंग्रजी नववर्ष रात्री बारा वाजता साजरे करतात. त्यामुळे दुसऱ्या दिवशी उठायला उशीर, जल्लोषाची नशा या धुंदीतून बाहेर आल्यावर पहिल्याच दिवशीचं वेळापत्रक ढासळतं. मग आरोग्यासाठी, ध्येयपूर्तीसाठी केलेल्या संकल्पाचे काय? पहिल्याच दिवशी आपल्या संकल्पाला सुरुंग लागतो. सकाळी बुद्धी सतेज आणि मन उत्साही असते. भविष्यकाळात अपेक्षित असलेली सत्यम्, शिवम्, सुंदरम्ची आराधना करता येते. सूर्याच्या तेजश्री आपले नाते जोडले जाते. नव्या वर्षात पहिल्या दिवसाची सुरुवात प्रसन्न व्हावी, उत्साहवर्धक व्हावी असे आपल्याला वाटते ना. त्याच आत्मचैतन्याची जागृती घेऊन नववर्ष आले आहे. चला चिंतन, मननाला आकार देऊ. नवीन सत्संकल्पांच्या पूर्तीचा ध्यास घेऊन नववर्षाचे प्रसन्न सकाळी स्वागत करण्यास सज्ज होऊया.

**स्नेहल प्रकाश खंडागळे**/नागपूर

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# मराठवाड्यामध्ये सोलर पॅनल दुरुस्ती व देखभाल प्रशिक्षण कार्यक्रमाच्या माध्यमातून खुल्या प्रवर्गातील उमेदवारांना उद्योग उभारण्याची संधी

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२८ डिसेंबर**

महाराष्ट्र संशोधन उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत), पुणे व महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र, छत्रपती संभाजी नगर यांच्या संयुक्त विद्यमाने खुल्या प्रवर्गातील अमृत संस्थेच्या लक्षित गटातील उमेदवारांसाठी मोफत सोलर पॅनल इंस्टॉलेशन वर आधारीत निवासी तांत्रिक उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम छत्रपती संभाजी नगर व लातूर येथे दोन बॅच मध्ये दिनांक ०७ /०१ /२०२५ ते २४/०१/२०२५ या अठरा दिवसाच्या कालावधीमध्ये सुशिक्षित बेरोजगार युवकांना तांत्रिक व उद्योजकीय प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

अशा प्रकारे असेल प्रशिक्षण

सध्या ऊर्जेचा तुटवडा भासत असल्यामुळे शासनाचे धोरण सोलर ऊर्जा निर्मितीला प्राधान्य देण्याचे आहे. त्यामुळे सोलर ऊर्जा निर्मितीसाठी शासनाच्या वतीने सबसिडीच्या दरामध्ये शेतकरी तसेच लाभार्थ्यांना सोलर पॅनल देण्यात येत आहेत. परंतु सदरील पॅनल इन्स्टॉलेशन, मेंटेनन्स, दुरुस्ती करणारे मनुष्यबळ मराठवाड्यामध्ये कमी प्रमाणात उपलब्ध आहे. प्रशिक्षणाच्या माध्यमातून बेरोजगार युवकांना रोजगार व उद्योग करण्याची संधी या प्रशिक्षणाद्वारे उपलब्ध होणार असून प्रशिक्षणामध्ये प्रशिक्षणार्थींची निवड प्रत्यक्ष मुलाखतीद्वारे करण्यात येणार आहे. तसेच मराठवाड्यातील प्रत्येक तालुक्यातून एक याप्रमाणे सदरील प्रशिक्षणासाठी उमेदवारांची निवड करण्यात येणार आहे.

कोण कोण घेऊ शकणार प्रशिक्षण

सदरील प्रशिक्षण हे खुल्या प्रवर्गातील अमृत लक्षित गटातील उमेदवारांसाठी म्हणजे (ब्राह्मण, बनिया, वत्स, कम्मा, कायस्त, नायर, एयांगर, पाटीदार, बंगाली, पटेल, मारवाडी, यलमार, त्यागी, ठाकूर, मारवाडी, सेनगुनथर, सिंधी, राजपुरोहित, नायडू,) इत्यादी प्रवर्गातील लाभार्थींना सदरील प्रशिक्षण कार्यक्रमांमध्ये प्रत्यक्ष मुलाखतीद्वारे सहभागी होता येईल. प्रवेशासाठी पात्रता शिक्षण किमान १२ वी पास, पदवीधर, तांत्रिक पदवीधारकास प्राधान्य असून वयोमर्यादा २१ ते ५० वर्ष असून मराठवाड्यातील प्रत्येक तालुक्यातील उमेदवारांना प्रशिक्षणामध्ये सहभागी होण्यासाठी प्राधान्य देण्यात येणार आहे.

शैक्षणिक पात्रता आणि नियम

शैक्षणिक गुणवत्तेचे प्रमाणपत्र/गुणपत्रिका, शाळा सोडल्याचा दाखला, आधार कार्ड, पॅन कार्ड, तहसीलचे अधिवास प्रमाणपत्र, जातीचा उल्लेख असलेल्या कोणत्याही शासकीय कागदपत्राचा पुरावा, कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न ८ लाखापेक्षा कमी असल्याचे तहसील उत्पन्न दाखला, विवाहित असल्यास महिलांसाठी गॅझेट किंवा विवाह नोंदणी प्रमाणपत्र किंवा पॅन कार्ड प्रवेश अर्ज सोबत झेरॉक्स प्रतिमध्ये जोडणे आवश्यक आहे. www.mahaamrut.org.in या वेबसाईटवर आपला अर्ज अपलोड करून, अर्जाची हार्ड कॉपी व अर्जासोबत आवश्यक कागदपत्राची झेरॉक्स प्रत जोडून संबंधित जिल्ह्यातील जिल्हा प्रकल्प अधिकारी द्वारा जिल्हा उद्योग केंद्र किंवा उद्योग भवन या ठिकाणी प्रत्यक्ष अर्ज सादर करणे आवश्यक आहे.प्रवेश अर्ज जिल्हा कार्यालयामध्ये सादर करण्याची अंतिम दिनांक ०१/०१/२०२५ असून प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या लाभार्थींसाठी दिनांक २३/ १२ /२०१४ रोजी एम सी ई डी जिल्हा कार्यालय येथे नि:शुल्क एकदिवसीय परिचय कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला आहे. प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांनी संबंधित सर्व जिल्ह्याच्या प्रकल्प अधिकारी, महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र द्वारा जिल्हा उद्योग केंद्र किंवा उद्योग भवन या ठिकाणी संपर्क साधावा व आपला प्रवेश अर्ज सादर करावा असे आवाहन श्री विजय जोशी व्यवस्थापकीय संचालक अमृत, पुणे, श्री बी. टी. यशवंते, कार्यकारी संचालक, एम सी ई डी तथा उद्योग सहसंचालक, छत्रपती संभाजी नगर, श्री सुदाम थोटे, विभागीय अधिकारी, महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र, छत्रपती संभाजीनगर यांनी केले आहे.



उपविभागीय जलसंधारण अधिकारी, जि.प.ल.पा.उपविभाग केज येथे शाखा अभियंता या पदावर कार्यरत असलेले मनोहर दिनकरराव कुलकर्णी यांचा सेवानिवृत्ती समारंभ निमित्त बीड येथे आयोजित कार्यक्रमात स्वागत सत्कार करतांना श्रीकांत कुलकर्णी

# माजलगावात सामुदायिक उपनयन संस्काराचे आयोजन

## ९ मार्च ला होणार कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.२८ डिसेंबर**

शहरामध्ये समस्त ब्राम्हण समाजाच्या वतीने सामुदायिक उपनयन संस्काराचे आयोजन दि. ९ मार्च २०२५ ला करण्यात आले असुन समाजातील गरजु व इच्छुक पालकांनी बटुंची नोंदणी करावी असे आवाहन आयोजन समितीचे अध्यक्ष डॉ. सचिन देशमुख यांनी दिली आहे.

या सोहळ्यास समाजातील संत महंतांची उपस्थिती असणार असुन त्यांचे मार्गदर्शन व आशिर्वाद लाभणार आहेत. समाजाचे एकत्रीकरण, विचारांची देवाण – घेवाण तसेच अनावश्यक खर्चाला फाटा देता यावा या उद्देशाने या सामुहिक उपनयन संस्काराचे आयोजन दि. ९ मार्च २०२५ रविवार रोजी माउली लॉन्स येथे करण्यात आले आहे. नुकत्याच झालेल्या समस्त ब्राम्हण समाजाच्या बैठकीत कार्यकारणी जाहिर करण्यात आली असुन समितीच्या अध्यक्षपदी डॉ. सचिन देशमुख, उपाध्यक्ष विनायक रत्नपारखी, कार्यवाह बप्पा देशमुख, सहकार्यवाह नंदु आनंदगांवकर, सचिव संदिप संदिकर, सहसचिव अमर कान्हापूरकर, कोषाध्यक्ष मुकूंद जोशी, गणेश मुळी तर प्रसिध्दी प्रमुख दत्ता महाजन तसेच विवीध नियोजन समित्यांची स्थापना करण्यात आली असुन समाजातील गरजु व इच्छुक पालकांनी बटुंची नोंदणी करावी असे आवाहन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

याठिकाणी करा बटूंची नोंदणी

माजलगाव शहरात समस्त ब्राम्हण समाजाच्या वतीने आयोजित सामूहिक उपनयन संस्काराचे आयोजन करण्यात आले आहे. शहरात पाच ठिकाणी नाव नोंदणीची सुविधा करण्यात आली असुन सायली मेडीकल मो. ९४२१३३७७८३, देशमुख सराफ मो.९४२११६१२६८, राहुल मेडीकल मो. ९७६६२२४५९२, सेवा मेडीकल मो. ९४२२३८०८४२,



जगदंबा फर्निचर मो. ९८५०८१०६३५ या ठिकाणी नोंदणी करावी असे आवाहन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

# गेवराई शहरात ओला इलेक्ट्रिकच्या स्टोअर आणि सर्व्हिस सेंटरचे नवीन दालनाचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.२८ डिसेंबर**

ओला इलेक्ट्रिकच्या स्टोअर आणि सर्व्हिस सेंटरचे भव्य उद्घाटन बुधवार दि.२५ रोजी गेवराई शहरात तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष मधुकर तौर यांच्या हस्ते करण्यात आले.



ओला इलेक्ट्रिकलने अत्यंत स्पष्ट ध्येय निश्चित केलेले आहे: भारताला एक वैश्विक एत केंद्र बनवणे. ४००० स्टोअर्सचा विस्तार करत असताना प्रत्येक शहरात, गावात, तालुक्यात सेविंग्जवाल्या स्कूटर्स सहजपणे उपलब्ध करून देण्यासाठी तसेच इलेक्ट्रिक मोबिलिटी च्या क्षेत्रातील एक नवे युग साकार करण्यासाठी एकाच दिवशी बुधवार दि.२५ रोजी उद्घाटन करण्यात आले. याच धर्तीवर बुधवार रोजी गेवराई शहरात ओला इलेक्ट्रिकच्या स्टोअर आणि सर्व्हिस सेंटरचे भव्य उद्घाटन तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष मधुकर तौर यांच्या हस्ते करण्यात आले. डॉ. नागनाथ मोटे, शिवसेना ता.प्रमुख शिनुभाऊ बेदरे, कैलास लोया, मजर पठाण, ताहेर पठाण, रामेश्वर पानखडे, इनुसभाई अन्सारी, बबलूभाई पठाण, मोजभाई पठाण, सचिन दाभाडे, सिनुभाऊ बेदरे, अमोल वैद्य, इम्रान पठाण व राजू पठाण आदींची उपस्थिती होती.

# दीनदयाळ नागरी सहकारी बँकेच्या दिनदर्शिका–२०२५ चे प्रकाशन

## दीनदयाळ बँकेची दिशादर्शक दिनदर्शिका–बँकेचे अध्यक्ष ॲड.मकरंद पत्की

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.२८ डिसेंबर**

मराठवाड्याच्या बँकिंग क्षेत्रात सातत्यपूर्ण उल्लेखनीय कार्य करून वेगाने प्रगतीपथाकडे झेपावणाऱ्या दीनदयाळ नागरी सहकारी बँकेच्या दिनदर्शिका – २०२५ चे प्रकाशन शुक्रवारी करण्यात आले. यावेळी बोलताना बँकेचे अध्यक्ष ॲड.मकरंद पत्की यांनी दीनदयाळ बँकेची दिनदर्शिका ही वैशिष्ट्यपूर्ण व दिशादर्शक असून दिनदर्शिकेत चित्रीत केलेल्या प्रसंगांचे नेमक्या व समर्पक शब्दांत विश्लेषण केले.



दीनदयाळ नागरी सहकारी बँकेच्या वैशिष्ट्यपूर्ण दिनदर्शिका – २०२५ चे प्रकाशन शुक्रवार, दिनांक २७ डिसेंबर रोजी बँकेच्या कै.गोपीनाथराव मुंडे सभागृहात सायंकाळी ५ वाजता संपन्न झाला. यावेळी बँकेचे अध्यक्ष ॲड.मकरंद पत्की, उपाध्यक्ष ॲड.राजेश्वर देशमुख, बँकेच्या संचालिका व माजी अध्यक्षा सौ.शरयुताई हेबाळकर, संचालक बिपिन क्षिरसागर, जयकरण सुरेशकांबळे, प्रा.अशोक लोमटे, ॲड.अशोक कुलकर्णी आणि बँकेचे मुख्यकार्यकारी अधिकारी सनतकुमार बनवसकर यांच्या शुभहस्ते दिनदर्शिका प्रकाशन करण्यात आले. याप्रसंगी उपस्थितांशी संवाद साधताना दीनदयाळ नागरी सहकारी बँकेचे अध्यक्ष ॲड.मकरंद पत्की यांनी दीनदयाळ बँकेची दिनदर्शिका ही वैशिष्ट्यपूर्ण व दिशादर्शक असून दिनदर्शिकेत चित्रीत केलेल्या प्रसंगांचे नेमक्या व समर्पक शब्दांत विश्लेषण केले. वैशिष्ट्यपूर्ण दिनदर्शिके संदर्भात बोलताना अध्यक्ष ॲड.पत्की यांनी दीनदयाळ बँकेच्या दिनदर्शिकेत हिंदू मानकांचे प्रतीक चित्रांकीत असून त्यांचे महत्त्व विषद केले. तसेच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्थापनेला शंभर वर्षपूर्तीनिमित्त सध्या सुरू असलेल्या संघ कार्यातील पंचप्रण या संकल्पनेचा विस्ताराने समावेश केल्याचे ही विदीत केले. तर बँकेचे मुख्यकार्यकारी अधिकारी सनतकुमार बनवसकर यांनी आपल्या दीनदयाळ बँकेची सुंदर अशी दिनदर्शिका लवकरच आपणांस आपल्या जवळच्या शाखेत उपलब्ध होईल असे सांगितले. दिनदर्शिका प्रकाशन सोहळ्याच्या प्रारंभी सर्वप्रथम भारताचे माजी पंतप्रधान मनमोहन सिंग यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बँकेचे मुख्यकार्यकारी अधिकारी सनतकुमार बनवसकर यांनी केले. तर उपस्थितांचे आभार बँकेचे लेखा परीक्षण विभागप्रमुख समीर शास्त्री यांनी मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी दीनदयाळ नागरी सहकारी बँकेच्या सर्व सन्माननीय अधिकारी, कर्मचारीवृंद यांनी पुढाकार घेतला.

# दिनांक ३ ते ८ जानेवारी दरम्यान होणाऱ्या बालझुंबड–२०२५ या उपक्रमात तालुक्यातील जास्तीत जास्त शाळा व विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे–राजकिशोर मोदी

**रौप्य महोत्सवी वर्षा निमित्ताने बालझुंबड – २०२५ मध्ये अनेक वैविध्यपूर्ण कार्यक्रमांचे आयोजन**

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.२८ डिसेंबर**

प्रियदर्शनी क्रीडा, सांस्कृतिक व व्यायाम मंडळाच्या वतीने प्रति वर्षाप्रमाणे यावर्षीही सलग पंचवीसाव्या बालझुंबडचे आयोजन करण्यात आले आहे. अंबाजोगाई तालुक्यातील सर्व शाळा व शालेय विद्यार्थ्यांसाठी दिनांक ३ जाने ते ८ जाने २०२५ या दरम्यान बालझुंबडचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमामुळे तालुक्यातील विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना चालना मिळते.तेव्हा अंबाजोगाई तालुक्यातील जास्तीत जास्त शाळा व शाळेतील विद्यार्थ्यांनी यामध्ये सहभागी व्हावे असे आवाहन संयोजक प्रियदर्शनी क्रीडा व सांस्कृतिक मंडळाचे अध्यक्ष राजकिशोर मोदी , सांस्कृतिक विभाग प्रमुख दिनकर जोशी व संचालक संकेत मोदी यांनी केले आहे .

मागील २४ वर्षापासून प्रियदर्शनी क्रीडा मंडळाच्या वतीने बालझुंबड हा उपक्रम अंबाजोगाई शहरात अखंडीतपणे राबविण्यात येत आहे. यंदाचे वर्ष हे बालझुंबड या उपक्रमाचे रौप्य महोत्सवी वर्ष म्हणून साजरा करण्यात येत आहे. प्रतिवर्षी तालुक्यातील सर्व शाळां या उपक्रमात उत्स्फूर्त असा प्रतिसाद देत असतात. याही वर्षी तालुक्यातील सर्व शाळा यामध्ये सहभागी होतील अशी अपेक्षा राजकिशोर मोदी यांनी व्यक्त केली आहे .

बालझुंबड हा उपक्रम तालुकास्तरावर आयोजीत केला जात असल्यामुळे त्यासाठी आवश्यक ते नियोजन देखील त्याचप्रमाणे मंडळाच्या वतीने करण्यात येत असते. या उपक्रमातुन अंबाजोगाई तालुक्यातील विविध शालेय विद्यार्थ्यांच्या कलागुणांना यातून संधी प्राप्त होत आहे. क्रीडा मंडळाचे पदाधिकारी व कार्यकर्ते विद्यार्थ्यांच्या स्वागताच्या तयारीत असून हा उपक्रम अतिशय शिस्तबध्द व नियोजन बद्ध पार पाडण्यासाठी सज्ज झाले आहेत. रौप्यमहोत्सवी वर्षामुळे यंदा स्पर्धेचे वैशिष्टयपुर्ण नियोजन करुन तालुक्यातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना सहभागी करुन घेण्यासाठी संयोजक प्रयत्नशील आहेत.

बालझुंबड–२०२५ या उपक्रमांतर्गत इ.१ ली ते ४ थी गटासाठी रंगभरण स्पर्धा, वैयक्तीक नृत्य, समुह नृत्य, इ. ५ वी ते ७ वी व इ. ८ वी ते १० वी च्या विद्यार्थ्यासाठी पी.पी.टी. स्पर्धा (झझढ ऊेशींशीिंळेप), प्रश्नमंजुषा स्पर्धा (टीळू ऊेशींशीिंळेप), चित्रकला, वैयक्तीक नृत्य, समुहनृत्य स्पर्धा आयोजित करण्यात आलेल्या आहेत. तालुक्यातील सर्व विद्यार्थ्यांना संधी उपलब्ध करुन देण्यासाठी बालझुंबड हे खुले व्यासपीठ आहे. अंबाजोगाई तालुक्यातील जवळपास ७० ते ८० शाळेतील विद्यार्थी आपल्या शाळांच्या माध्यमातून सहभागी होतात. बालझुंबडच्या माध्यमातून आजपर्यंत अनेक गुणी कलावंत तयार झाले असून ते नाटक, सिनेमा तसेच क्रीडाविश्वाच्या माध्यमातून विविध खेळाडू व कलांच्याद्वारे आपल्या छाप अवघ्या महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण देशभर पाडत आहेत. तालुक्यातील अनेक शाळांमध्ये वार्षिक स्नेहसंमेलन होत नाही अशा शाळा व शाळेतील विद्यार्थ्यांसाठी बालझुंबड ही केवळ एक स्पर्धा नसून एक पर्वणीच ठरल्या जात आहे. बालझुंबड हा तालुक्यातील विद्यार्थ्यांसाठी एक स्नेह मेळावा, स्नेह संमेलन तथा आनंदोत्सवच ठरतो. यामध्ये सर्व स्पर्धकांना विनामूल्य प्रवेश दिला जातो. तेव्हा सर्व स्पर्धकांनी आपले प्रवेश निश्चित करण्यासाठी आपल्या शाळेतील मुख्याध्यापक किंवा संयोजक यांचेशी संपर्क साधुन तात्काळ आपला प्रवेश नोंदवावा.

स्पर्धेच्या अधिक माहिती व प्रवेशासाठी विद्यार्थ्यांनी पालकांनी व शिक्षकांनी समन्वयक, बालझुंबड– २०२५, जोधाप्रसादजी माध्यमिक विद्यालय गुरुवारपेठ, अंबाजोगाई येथे संपर्क साधावा व अंबाजोगाई तालुक्यातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवावा असे आवाहन एका प्रसिध्दी पत्रकाद्वारे संयोजक राजकिशोर मोदी, सांस्कृतिक विभाग प्रमुख दिनकर जोशी, संचालक संकेत मोदी तसेच समन्वयक राजेश कांबळे, मुख्याध्यापक आनंद टाकळकर , विनायक मुंजे संपर्क क्र.९८६०३३७००८/९८५०५९१०६१ / ९४२१३४१६८८) यांनी केले आहे. बालझुंबड–२०२५ हा कार्यक्रम न्यू व्हिजन पब्लिक स्कुल, विलासराव देशमुख सभागृह तसेच मुकुंदराज सांस्कृतिक सभागृहात संपन्न होणार असल्याची माहिती संयोजकांच्या वतीने देण्यात आली आहे.

# गावातील प्रश्न गावातच मिटवा: चाकरवाडी, पांढऱ्याची वाडी येथे तहसीलदार शेळके यांचे गावकऱ्यांना आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२८ डिसेंबर**

शुक्रवार २७ डिसेंबर रोजी बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके , येळंबघाटच्या मंडळ अधिकारी,ग्राम महसूल अधिकारी यांनी पांढऱ्याचीवाडी , चाकरवाडी येथे विविध कामासाठी भेट दिली.

बीडचे प्रभारी जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, उपविभागीय अधिकारी कविता जाधव, उपजिल्हा निवडणूक अधिकारी महेंद्र कुमार कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली तहसीलदार चंद्रकांत शेळके यांचे ग्रामीण भागात दौरे सुरू आहेत.पांढऱ्याची वाडी येथे शेतीच्या वादासंदर्भात तहसीलदार शेळके यांनी दुपारी ११ च्या सुमारास भेट दिली . वादी, प्रतिवादी व पंच यांच्या समक्ष पाहणी केली . रीतसर पंचनामा करून घेतला . सर्व संबंधितांचे म्हणणे ऐकून घेतले व सर्व क्षेत्राची प्रत्यक्ष बांधावर जाऊन पाहणी केली .

त्यांनतर श्रीक्षेत्र चाकरवाडी येथे जाऊन संत श्री ज्ञानेश्वर माऊली दादांचे समाधीस्थळी जाऊन दर्शन घेतले . या ठिकाणचा परिसर पाहून मनाला शांती लाभते असे यावेळी तहसीलदार शेळके यांनी नमूद केले.

त्यानंतर चाकरवाडी येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेस तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी गावकऱ्यांसह भेट दिली . निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांचे नेहमी म्हणणे असते की शाळा आणि घर यात फरक असू नये . विद्यार्थ्यांना शाळा हेच घर वाटावे . शेळके यांनी सुरुवातीस पोषण आहाराबाबत माहिती घेतली . पोषण आहार कुठे शिजवला जातो त्या जागेची पाहणी केली . त्या ठिकाणी खिचडी शिजवत असल्याचे त्यांनी पाहिले . त्या खिचडीत काय काय टाकले आहे, तेल कोणते वापरले आहे , याबाबत सविस्तर माहिती घेतली . विद्यार्थ्यांना पोषक आहार दिला गेला पाहिजे, त्यात कोणीही हयगय करता कामा नये , अशा सूचना यावेळी दिल्या. यावेळी बोलताना त्यांनी म्हटले की विद्यार्थी हे समाजाचे व देशाचे भावी नागरिक आहेत. त्यांना ज्ञानार्जन करताना ज्याप्रमाणे आपण उत्कृष्ट पद्धतीने शिकविले पाहिजे यावर लक्ष देतो, त्याच प्रकारे त्यांना सकस आहार मिळेल यासाठी मुख्याध्यापक , शिक्षकांसह गावकऱ्यांनी सुद्धा काळजी घेतली पाहिजे. निवडणूक विभागाचे उपजिल्हाधिकारी महेंद्रकुमार कांबळे यांच्या सूचनेनुसार तहसीलदार शेळके यांनी मतदान केंद्राची पाहणी केली. मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांची कामे व्यवस्थित सुरु असल्याची खात्री केली.

त्यानंतर तहसीलदार शेळके यांच्या हस्ते पर्यावरण पूरक अश्या झाडांचे शाळेच्या आवरात वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी ग्राम महसूल अधिकारी अमोल अधापुरे यांनी शाळेतील शिक्षक, गावकरी, विद्यार्थी यांच्याशी परिचय करून दिला. तसेच विद्यार्थ्यांना सांगितले की तुम्ही सुद्धा भरपूर अभ्यास करा. संघ लोकसेवा आयोग , राज्य लोकसेवा आयोगाच्या परीक्षा द्या. मोठ्या पदावर अधिकारी म्हणून विराजमान व्हा. ज्यांच्या अंगी कला कौशल्य आहे, त्यांनी त्या त्या क्षेत्रात आपले करिअर घडवा.

वृक्षारोपण केल्यानंतर तहसीलदार शेळके यांना लहान चिमुकल्यांसोबत फोटो काढण्याचा मोह आवरता आला नाही . त्यांनी शाळेच्या परसबागेची पाहणी केली . शाळेतील शिक्षिका लता ससाने यांनी माहिती दिली की या परसबागेत आम्ही वांगे , बटाटे, लसूण , कांदे लावतो . त्यांची काळजी घेतो आणि याच परसबागेतून निघणारे वांगे, बटाटे , कांदे विद्यार्थ्यांना दुपारचा पोषण आहार दिल्या जातो , त्यात वापरतो . त्यामुळे बाहेरून भाजीपाला आणण्याची गरज भासत नाही . ताजा भाजीपाला आम्ही इथे वापरू शकतो . त्यांनतर तहसीलदार शेळके यांनी नवीन वर्गखोल्यांचे सुरु असलेल्या बांधकामाची पाहणी केली .

बीडच्या उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांचे नेहमी म्हणणे असते की ग्रामीण भागात जाऊन शेतकऱ्यांशी संवाद साधला पाहिजे , शासनाच्या ज्या योजना आहेत त्यांच्यापर्यंत पोहोचविल्या पाहिजेत . त्याचाच एक भाग म्हणून ई पीक पाहणी करण्यासाठी गावकऱ्यांसह तहसीलदार , मंडळ अधिकारी , ग्राम महसूल अधिकारी हे सर्व जण चाकरवाडी येथील शेतकरी प्रकाश डोईफोडे , सर्व्हे क्रमांक ९३३ / आ यांच्या शेतात पोहोचले . शेतकऱ्यांना प्रत्यक्ष बांधावर जाऊन मार्गदर्शन केले . याठिकाणी मंडळ अधिकारी दीपाली आघाव यांनी ई पीक पाहण्याची प्रक्रिया याबद्दल सविस्तर माहिती उपस्थितांना दिली . यावेळी अधिकची माहिती त्यांनी नमूद केले की ई पीक पाहणी करत असताना तंतोतंत जिओ फेन्सिंगच्या माध्यमातून होणार असल्यामुळे शेतकऱ्यांना स्वतःच्या गटांमध्ये उभे राहूनच ई पाहणी करावी लागणार आहे . अशा प्रकारची ई पिक पाहणी केल्यानंतर त्यातील १०% ई पिक पाहणी ही ग्राम महसूल अधिकारी यांच्या माध्यमातून तपासली जाणार आहे . तहसीलदार शेळके यांनी स्वतः महादेव डोईफोडे शेतकऱ्याची मोबाईल पवर ई पीक पाहणी करून दिली . उपस्थित शेतकऱ्यांशी संवाद साधला . मंडळ अधिकारी , तलाठी यांनी नियमानुसार जे फेरफार मंजूर करणे योग्य असतील , ते तात्काळ मंजूर करावे . कोणताही फेरफार प्रलंबित ठेवण्यात येऊ नये , नागरिकांना कोणत्याही प्रकारची अडचण होणार नाही किंवा त्यांना असुविधा होणार नाही यासाठी प्रयत्नशील राहावे , असेही आवाहन केले . सर्व ग्राम महसूल अधिकारी यांच्या वतीने बोलताना मंडळ अधिकारी दीपाली आघाव यांनी आश्वासन दिले की मंडळातील नागरिकांची अथवा शेतकऱ्यांची कोणतीही कामे , रस्त्याची कामे अथवा इतर कामे प्रलंबित राहणार नाहीत याबाबत पूर्णतः दक्षता घेण्यात येईल.

या दौऱ्यावेळी तहसीलदार यांचेसमवेत मंडळ अधिकारी दिपाली आघाव, ग्राम महसूल अधिकारी अमोल अधापुरे, स्वाती घुगे, अक्षय चव्हाण, शिक्षिका लता ससाणे, पोलीस पाटील नानासाहेब काकडे, रेखा पवळे ,धम्मदिप वंजारे , गणेश माने ,राजेश कवडे ,दत्ता मोरे ,किशोर मोरे , वैभव मोरे, सखाराम आणवने, श्रीमंत मोरे , प्रकाश डोईफोडे , चंद्रसेन माने, सखाराम सस्ते, प्रशांत डोईफोडे व शेतकरी उपस्थित होते.

तहसीलदार यांनी स्वतः गावात येऊन शाळेला भेट देणे, गावकऱ्यांची प्रत्यक्ष संपर्क साधणे, यामुळे गावकऱ्यांना आणि विद्यार्थ्यांना यांना मनस्वी आनंद झाल्याचे दिसून आले . अशाप्रकारे तहसीलदार दर्जाचे अधिकारी गावकऱ्यांची बोलत असतील, त्यांच्या अडचणी समजून घेत असतील तर शासनाचे व जिल्हा प्रशासनाचे आभार मानले पाहिजे, असे यावेळी गावकऱ्यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले.

# विधानसभा मतदारसंघातील जलजीवन मिशनच्या कामांचा आ. मुटकुळेंनी घेतला आढावा

## भूजल सर्वेक्षण विभागाने चुकीच्या मार्गदर्शनावर केली नाराजी व्यक्त



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २८ डिसेंबर.**
हिंगोली विधानसभा मतदारसंघातील जलजीवन मिशनच्या कामांचा आढावा भाजपचे आ. तान्हाजीराव मुटकुळे यांनी घेतला. यावेळी भूजल सर्वेक्षण विभागाने विहीरी बांधकामासाठी चुकीच्या पध्दतीने मार्गदर्शन केल्यामुळे ५० टक्के विहीरींची जानेवारी महिन्यातच पाणीपातळी घटणार असल्यामुळे या योजनेचा उद्देश साध्य होणार नाही. यावेळी आ. मुटकुळे यांनी भूजल सर्वेक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांसह निकृष्ट काम करणाऱ्या अधिकाऱ्यांना चांगलेच धारेवर धरीत कामे दर्जेदार करण्याच्या सुचनाही दिल्या.

केंद्र शासनाने ग्रामीण भागात हर घर जल, हर घर नल यासाठी जलजीवन मिशन अंतर्गत पाणीपुरवठा योजना सुरू केली आहे. जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, महाराष्ट्र जीवन प्राधीकरण आणि भूजल सर्वेक्षण विभागातील कार्यकारी अभियंता, उपकार्यकारी अभियंता यांच्यासह अभियंता व तांत्रिक अधिकारी, कर्मचारी यांची बैठक घेतली. यावेळी हिंगोली विधानसभा मतदारसंघातील हिंगोली आणि सेनगाव तालुक्यातील गावांचे सरपंच मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी आ. तान्हाजीराव मुटकुळे यांनी प्रत्येक गावनिहाय जलजीवन मिशन योजनेचा आढावा घेतला. यावेळी अनेकांनी कामे करतांना येत असलेल्या अडचणी आ. मुटकुळेंनी ऐकून घेतल्यानंतर जलजीवन मिशन योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याच्या सूचना संबंधीत अधिकारी आणि कर्मचारी यांना दिल्या आहेत. काही गावांतील सरपंचांनी या योजनेला विरोध केला असून या सरपंचावंर अपात्रतेची कार्यवाही करण्याचा इशारा यावेळी आ. मुटकुळेंनी दिला. भूजल सर्वेक्षण अधिकाऱ्यांनी जानेवारी महिन्यात विहीरीच्या पाणीपातळीबाबत अहवाल देत संबंधीत गावांना विहीरी बांधण्याचे आदेश दिले होते परंतु एप्रील मे आणि जून या महिन्यात गावांत तीव्र पाणीटंचाई भासते. त्यामुळे भूजल सर्वेक्षण विभागाने चुकीच्या पध्दतीने विहीरीचे बांधकाम करण्याचे आदेश दिल्यामुळे आ. मुटकुळे यांनी नाराजी व्यक्त केली तसेच यासाठी उपाययोजना करण्याचे आदेशही संबंधीत अधिकाऱ्यांना दिले.

हिंगोली विधानसभा मतदारसंघात रस्त्याची कामे तसेच इतर विकास कामे जोमाने सुरू झाले असून पुढील काळात विधानसभा मतदारसंघात विविध विकास कामांना सुरूवात होणार असल्याचे यावेळी आ. मुटकुळे यांनी सांगितले. यावेळी भाजपचे ॲड के के शिंदे, मोतीराम इंगोले यांच्यासह अधिकारी उपस्थित होते.

# हिंगोली शहरातील युवकांतर्फे आ. मुटकुळेंचा नागरी सत्कार



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २८ डिसेंबर**
हिंगोली विधानसभेचे आ. तान्हाजीराव मुटकुळे तिसऱ्यांदा प्रचंड मताने विजय झाल्यानंतर हिंगोली शहराच्यावतीने भव्य असा नागरी सत्कार करण्यात आला. यावेळी युवा नेते शिवाजीराव मुटकुळे यांनी युवकांना संबोधीत करतांना तुमचे अडीअडचणी असेल, कोणते काम असेल तर मी सदैव तुमच्या सोबत राहणार आहे, असे आश्वासन युवा मुटकुळे शिवाजीराव यांनी दिले

त्याचबरोबर आमदार तान्हाजी मुटकुळे यांनी सत्काराला उत्तर देतांना मी आजारी असतांना सुद्धा अनेक लोकांनी माझ्यावरती टीका टिपणी केली. परंतु आम्ही कोणत्याही टीकेला उत्तर न देता आम्ही फक्त गेल्या दहा वर्षाच्या विकास कामाच्या जोरावर निवडून आलो. पुढील पाच वर्ष मी जनतेची सेवा पूर्ण प्रामाणिकपणाने करणार आहे. कधीही कुठल्याही विकास असेल ते पूर्ण करायचे माझे धैर्य आहे. यावेळी उपस्थित मंचावर जिल्हाध्यक्ष फुलाजी शिंदे माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर, माजी आमदार रामराव वडकुते, तालुका अध्यक्ष माणिक लोडे, तालुका अध्यक्ष हिंमत राठोड, माजी नगरसेवक उमेश गुट्टे, हमीद भाई प्यारेवाले, बाबा घुगे मिलिंद यंबल, सुनिता मुळे, भिकूलाल बाहेती मंचावर उपस्थित होते.

आ.तान्हाजीराव मुटकुळे तिसऱ्यांदा निवडून आल्याबद्दल हिंगोली शहरातील बाबा घुगे, संजय खंडेलवाल, संजय ढोके, श्याम खंडेलवाल, राजेंद्र अग्रवाल, आशिष जयस्वाल, आशिष शर्मा, कृष्णा ढोके, राज बांगर, जय घोडे, सुधीर पोफळईतकर, राहुल बांगर, करण भन्साळी, सुमंत नायक, अमित कुमार रोहिटीया, शिवानंद होकर्णे, सचिन शिंदे, अरुण पुंडगे, वैजनाथ शिंदे, शैलेश लाहोटी, नितीन गडदे, आकाश चितेवर, राहुल गिरी, सुनिता मुळे, सुनंदाताई मिश्रा, क्रिष्णा रूहटीया, ज्योती वाघमारे यांच्यावतीने नागरी सत्कार करण्यात आला.

# निपुण हिंगोली कार्यक्रमांतर्गत जिल्हाधिकाऱ्यांची पेडगाव शाळेला भेट

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २८ डिसेंबर**
हिंगोली जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या शाळेतील सर्व विद्यार्थ्यांचे मराठी इंग्रजी व गणित विषयातील पायाभूत क्षमता प्राप्त करण्यासाठी निपुण हिंगोली हा कार्यक्रम जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी हाती घेतला आहे. त्या अनुषंगाने जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी दि. २० डिसेंबर रोजी हिंगोली तालुक्यातील पेडगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेला भेट देऊन संवाद साधला.



या कार्यक्रमांतर्गत नोव्हेंबर महिन्याच्या शेवटी इयत्ता २ ते ८ वीच्या विद्यार्थ्यांची अध्ययन स्तर निश्चिती करण्यात आली होती. वर्गात वेगवेगळ्या स्तरावर विद्यार्थी असतात आणि त्यांना स्तरानुसार अध्यापन करणे गरजेचे आहे. म्हणून निपुण हिंगोली हा कार्यक्रम हाती घेण्यात आला असल्याचे जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी शिक्षकांशी संवाद साधताना स्पष्ट केले.

शिक्षकांचे शाळेवरील अनुपस्थिती बाबत तीव्र शब्दात नाराजी व्यक्त करताना त्यांनी मुख्याध्यापकांना जाब विचारला. या शाळेतील इयत्ता चौथी विद्यार्थ्यांची अध्ययनस्तर निहाय पडताळणी केली. मुलांच्या शिकण्यामध्ये फारसा फरक दिसून आला नाही. तेव्हा शिक्षकांना विचारणा केली असता त्यांनी स्तरानुसार कृती कार्यक्रम तयार केलेला नव्हता. तसेच विद्यार्थ्यांना पुढील स्तरावर नेण्यासाठी कोणकोणत्या कृती कराव्यात, हे सांगता आले नाही. मात्र या उलट इयत्ता ६ वीच्या विद्यार्थ्यांची अध्ययन स्तर निश्चितीच्या अनुषंगाने पडताळणी केली असता समाधान व्यक्त केले. या वर्गाच्या शिक्षिकेच्या प्रगतीचे कौतुकही केले.

विद्यार्थ्यांच्या अनुपस्थितीबाबत विचारणा करताना यासाठी शिक्षकांनी केलेल्या प्रयत्नांचाही आढावा घेतला. वारंवार पालक भेटी घेऊन, सभा घेऊन विद्यार्थी उपस्थितीसाठी शिक्षकांने प्रयत्न करण्याची गरज असल्याचे सांगितले. यावेळी पेडगाव शाळेच्या मुख्याध्यापकांनी जानेवारी २०२५ अखेरपर्यंत सर्व विद्यार्थी अंतिम स्तरावर पोचवण्यासाठी आम्ही सर्वतोपरी प्रयत्न करणार असल्याचे आश्वासन दिले. यावेळी शिक्षणाधिकारी प्रशांत दिग्रसकर, उपशिक्षणाधिकारी, गट शिक्षण अधिकारी, विस्तार अधिकारी, शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक उपस्थित होते.



**हिंगोली– नर्सी नामदेव येथील गुरूद्वारामध्ये दहावे शीख गुरू गोविंदसिंग यांचे सुपूत्र सहीबजादो बाबा जोरावर सिंग, आणि बाबा फतेहसिंग यांच्या स्मृतीनिमित्त त्यांना अभिवादन करून वीर बाल दिवस साजरा करण्यात आला. यावेळी भाजपचे आ. तान्हाजीराव मुटकुळे, जिल्हाध्यक्ष फुलाजीराव शिंदे, सरचिटणीस उमेश नागरे, नारायण खेडकर आदी. छाया– विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### आज स्वयंसिध्दा नारी मंचच्यावतीने व्याख्यान

हिंगोली– राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवन चरित्राच्या जनजागृतीसाठी स्वयंसिद्धा नारीमंच हिंगोलीच्यावतीने २९ डिसेंबर रविवार रोजी व्याख्यानाचे आयोजन हिंगोली शहरातील बियाणीनगर भागामध्ये करण्यात आले आहे. या निमित्त प्रमुख वक्त्या भारतीय स्त्री शक्ती शताब्दी विस्तारक अध्यक्षा प्रा.कल्पनाताई विनोद भागवत (धुळे) ह्या अहिल्यादेवी काल आणि उद्या या विषयावर व्याख्यान करणार आहेत. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नांदेड विभाग महिला समन्वयक संयोजिका डॉ.संध्याताई इंद्रजीतसिंह बैस व प्रमुख अतिथी ॲड. मनिषा सुरेश गडदे यांची उपस्थिती राहणार आहे. आयोजित केलेल्या व्याख्यानास महिला, पुरूष व विद्यार्थीनींनी उपस्थित रहावे असे आवाहन स्वंयसिद्धा नारीमंच हिंगोली यांच्यावतीने करण्यात आले आहे.

### उद्या शिवाजी महाविद्यालयात वाद–विवाद स्पर्धा


हिंगोली– शिवाजी महाविद्यालय येथे ३० डिसेंबर रोजी कै. एकनाथराव पवार यांच्या स्मृती प्रित्यर्थ भारतीय लोकशाही साठी सद्याची निवडणूक प्रक्रिया– योग्य/अयोग्य. या विषयावर आंतर–महाविद्यालयीन वाद–विवाद स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले आहे. कै. एकनाथराव पवार यांच्या स्मृती प्रित्यर्थ सुरू करण्यात आलेल्या वाद–विवाद स्पर्धेस चोविसावे वर्षे पूर्ण होत आहेत. मा. शिवाजी एकनाथराव पवार (निवृत शिक्षणाधिकारी )यांच्या संकल्पनेतून उदयाला आलेली ही स्पर्धा पंचवीसाव्या वर्षात पदार्पन करत आहे याचा आम्हाला अतिशय आनंद होतो. कै. एकनाथराव पवार ही वाद–विवाद स्पर्धा कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी आयोजित केली जाते व दोन्ही गटासाठी स्वतंत्र पारितोषिके दिली जातात. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये सभोवतालच्या प्रश्नांची जाण निर्माण व्हावी, राजकीय, राष्ट्रीय, सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक व सांस्कृतिक प्रश्नांबाबत त्यांना सखोल ज्ञान व्हावे व त्यांचा व्यक्तिमत्व विकसित व्हावा या उद्देशाने कै. एकनाथराव पवार यांच्या स्मृती प्रित्यर्थ वाद–विवाद स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले आहे. त्यासाठी आपण आपल्या महाविद्यालयाचा एक वरिष्ठ विभागातील संघ व एक कनिष्ठ विभागातील संघ पाठवून सहकार्य करावे ही विनंती. असे आव्हान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. क्षिरसागर बी.एस. आणि कार्यक्रमाचे संयोजक प्रा. डॉ. सुभाष शेरकर, प्रा. डॉ. सौ. सुनंदा भुसारे, प्रा. प्रियंका पवार, आणि प्रा.डॉ.रामभाऊ भाकरे यानी केले आहे.

### ३७ वाहन चालकांवर पोलिसांची कार्यवाही

हिंगोली– अवैध वाहतुक करणाऱ्या तसेच वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ३७ वाहन चालकांवर पोलिस विभागाच्यावतीने कार्यवाही करण्यात आली असून त्यांचेकडून ३४ हजार ५०० रूपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे. तसेच दारूबंदी कायद्यांतर्गत एका ठिकाणी छापा मारीत पोलीसांनी २ हजार १७० रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

# डॉ प्रकाश अंभोरे यांना राज्यस्तरीय पुरस्कार

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २८ डिसेंबर**
हिंगोली येथील भारतीय विद्या मंदिर शिक्षण संस्था संचलित श्रीमती शांताबाई मुंजाजी दराडे माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक तथा हिंगोली जिल्हा माध्यमिक आणि उच्च माध्यमिक मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष डॉ. प्रकाश सखाराम अंभोरे यांना संत गाडगेबाबा समाजरत्न राज्यस्तरीय पुरस्कार २०२४–२५ जाहीर झाला आहे. दै.भारत संग्राम व स्व. मधुकर खंडारे यांच्या स्मृती प्रित्यर्थ व सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त तसेच समाजभूषण अर्जुन गवई यांच्या वाढ दिवसानिमित्त



साखरखेर्डा ता. सिंदखेड राजा जि. बुलढाणा येथे हा पुरस्कार दि.३० डिसेंबर २०२४ रोजी प्रदान केला जाणार आहे.

डॉ. प्रकाश अंभोरे यांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याची दखल घेऊन माजी मंत्री मा. डॉ.राजेंद्र शिंगणे यांच्या शुभहस्ते पुरस्कार प्रदान करून त्यांचा गौरव केला जाणार आहे. यापूर्वी डॉ. प्रकाश अंभोरे यांना राष्ट्रीय शिक्षक रत्न नागरी पुरस्कार, महात्मा ज्योतिराव फुले राज्यस्तरीय शिक्षक पुरस्कार, कै. अण्णाराव टाकळगव्हाणकर स्मृती पुरस्कार व मराठवाडा रत्न पुरस्कार प्राप्त झालेले आहेत. याबद्दल भारतीय विद्या मंदिर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष, सचिव व सर्व सन्माननीय संचालक, संपूर्ण स्टाफ तसेच मुख्याध्यापक संघाचे सर्व सन्माननीय सदस्य, मित्र मंडळी यांनी अभिनंदन केले.

# अवैध गौणखनिज उत्खनन करणाऱ्यावर कार्यवाही करा– गोयल

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २८ डिसेंबर**
गौण खनिजाशी संबंधी प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने सर्व संबंधित विभागांचा परिणामकारक समन्वय साधण्यासाठी आणि अनधिकृत गौण खनिज उत्खनन व वाहतुकीशी संबंधित अपप्रवृत्तीवर नियंत्रण ठेवण्यासाठी जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांच्या अध्यक्षतेखाली दि. २६ डिसेंबर, २०२४ रोजी महसूल, पोलीस व परिवहन विभागातील अधिकारी यांची बैठक घेतली.



या बैठकीत जिल्हाधिकारी श्री. गोयल यांनी अवैध गौण खनिजाच्या उत्खनन व वाहतुकीशी संबंधित अपप्रवृतीवर सक्तीने नियंत्रण व परिणामकारक उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या . तसेच जिल्ह्यातील सर्व संबंधित विभागांनी समन्वय साधून काम करण्याचे निर्देश दिले. त्याअनुषंगाने जनतेने अवैध मार्गाने कोणत्याही प्रकारचे गौण खनिज खरेदी करु नये, असे आवाहन जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी केले आहे.

# विविध शाळांमध्ये गणित तज्ज्ञ डॉ. रामानुजन यांची जयंती साजरी






**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २८ डिसेंबर**
गणित तज्ञ डॉ. श्रीनिवास रामानुजन यांच्या जयंतीनिमित्त विविध शाळांमध्ये विद्यार्थ्यांनी गणितासंदर्भात शैक्षणिक साहीत्य तसेच कार्यक्रम सादर केले.

नांदेड येथील सांदिपनी पब्लिक स्कूलमध्ये विविध कार्यक्रम उत्साहात संपन्न झाले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला शाळेच्या मुख्याध्यापिका क्रांती कुलकर्णी यांच्या हस्ते डॉ. रामानुजन यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. त्यानंतर डॉ. रामानुजन यांच्या विषयी विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कु. शरयू मूर्ती, कु. श्रुष्टी काळे, कु. अनुष्का भोजने, कु. सान्वी भोजने, सुशांत जोंधळे, आधुनिक काळात गणिताचे महत्त्व सांगणारी एकांकिका सादर केली. यात कु. आराध्या भोले, कु. आरोही मानसपुरे, कु. परी वानखेडे, कु. लावण्या मामीडवाड, कु. कीर्ती किरवले, कु. गुंजन सेलूकर, कु. मानवी चव्हाण, कु. रितू जाधव, कु. अरीशा शेख, कु. रुपाली बोथीकर, कु. धनश्री नरवाडे, कु. अंजली महाथर यांनी भाग घेतला. तसेच मॅथ मॅजिक संकल्पना घेऊन ईशांत शिनगारे आणि आरव सुंदाळे (वर्ग ५) यांनी सादरीकरण केले, ज्यात मनात धरलेले संख्या अचूक ओळखता येते. गणिताचे सहशिक्षक दिनेश कुलकर्णी यांनी आधुनिक काळात रामानुजन यांचे महत्त्व मोजक्या शब्दांमध्ये विद्यार्थ्यांना सांगितले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु धनश्री कोकाटे आणि कु अर्पिता सिंह यांनी केले. या सर्व विद्यार्थ्यांना देवानंद वानखेडे, बसवराज पोतले आणि सौ संजीवनी, सौ गायत्री यांचे मार्गदर्शन मिळाले तसेच सर्व विद्यार्थ्यांनी गणित विषयावरील विविध मॉडेल बनवून त्याचे प्रदर्शन भरविले होते. त्या प्रदर्शनाचा सर्व विद्यार्थी आणि शिक्षक वृंदांनी आनंद लुटला. या कार्यक्रमाला संचालक सुनील राठोड, सहसंचालक मुकुल राठोड, विपुल राठोड, सौ. रेश्मा विपुल राठोड, सौ. माहेश्वरी मुकुल राठोड, शाळेच्या मुख्याध्यापिका क्रांती कुलकर्णी, उपमुख्याध्यापिका सौ.हरप्रीत कौर, प्रशासक मारुती मेखाले, गणिताचे व शाळेतील सर्व शिक्षक वृंद आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या.

भारतीय विद्या मंदिर शिक्षण संस्था संचलित श्रीमती शांताबाई दराडे माध्यमिक विद्यालय हिंगोली येथे थोर गणितज्ञ श्रीनिवास रामानुजन यांची जयंती साजरी करण्यात आली. मुख्याध्यापक डॉ. प्रकाश अंभोरे व उपमुख्याध्यापक श्री.जितेंद्र भट्ट यांच्या हस्ते प्रथम श्रीनिवास रामानुजन यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. काही विद्यार्थी, विद्यार्थिनींनी व गणीताध्यापक श्री. अमोल कान्हेड व श्री. नागनाथ सोळंके यांनी समयोचीत भाषणाच्या माध्यमातून गणितज्ञ श्रीनिवास रामानुजन यांच्या जीवन चरित्रावर प्रकाश टाकला. यानिमित्ताने विद्यार्थ्यांनी गणिती कोडी, गणिती उखाणे व गणिती ट्रिक्स सादर केल्या. गणिती प्रतिकृती तयार करून प्रदर्शनाच्या माध्यमातून गणिती सिद्धांत, व्याख्या व सूत्रे स्मरणात राहण्यासाठी उपयोगी पडेल असे सादरीकरण केले. विद्यार्थिनींनी गणिती रांगोळी काढून गणित दिवस साजरा केला. गणित अध्यापिका सौ. जयश्री धुमाळ व सौ. वर्षा डूब्बेवार यांनी मुलींना मार्गदर्शन केले. ज्येष्ठ गणित अध्यापक श्री. आनंद मस्के व श्री. राजकुमार बांगर यांनी सर्व विद्यार्थ्यांना प्रेरणा देऊन कार्यक्रम यशस्वी केला. दुपार सत्रात श्री. तुलसी चिलमुल व श्री. राम शेट्टे या अध्यापक महोदयांनी वरील प्रमाणेच सर्व कार्यक्रम घेऊन गणित दिवस साजरा केला. भारतीय विद्या मंदिर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष, सचिव व सर्व सदस्यांनी शिक्षक व विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# येळकोट...यळकोट...जय मल्हार....माळेगांव यात्रेला आज देवस्वारीने सुरुवात

## शासकिय दु:खवट्यामुळे नुतन वर्षात शासकीय कार्येक्रमाची रेलचेल

**डी.एन.कांबळे**
**लोहा,दि. २८ डिसेंबर**

दक्षिण भारतात प्रसिद्ध असलेल्या माळेगावची यात्रा जिल्हा परिषद नांदेड व पंचायत समिती लोहा यांच्या संयुक्त विद्यमाने यात्राचे आयोजन करण्यात येते पण यावर्षी जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुका झाल्या नसल्याने काही पदाधिकाऱ्यांचा तोरा दबक्या आवाजात दिसुन येईल.यात्रेच्या नियोजनात शासकीय अधिकाऱ्यांचे निरिक्षण आसल्याने यात्रेकरुना अनेक भौतिक सुविधा उपलब्ध करुन देण्यात विस्कळीत पणा तोंड देण्याची दाट शक्यता आहे.काही स्थानिक स्वराज्य संस्थेच्या लोकप्रतिनिधीचा या यात्रेत आगळा वेगळा डोल असतो पण अनेक स्थानिक स्वराज्य संस्थांच्या लोकप्रतिनिधी मान सन्मानापासुन अलिप्त राहाण्याची दाट शकते आहे.

देशाचे माजी पंतप्रधान मनमोहन सिंग यांचे अकाली निधन झाल्याने शासकीय दु:खवटा पाळण्यात येत आसल्याने २९ डिंबरला खंडोबा देवस्वारीची सुरुवात होऊन २ जानेवारी २०२५ पासुन शासकिय कार्यक्रम होणार आहेत असे शासकिय यात्रा प्रसिद्ध पत्रकातुन प्रसिद्ध देण्यात आली आहे.

माळेगांव यात्रा ग्रामीण भागात पर्वणी समजली जाते अनेक छोटेमोठ्या वस्तुंची खरेदी विक्री होते, अनेक कुटुंब संसारातील उपयोगी वस्तू खरेदी करण्याची मोठी रेलचेल आसते. ग्रामिण भागात व तांड्यावर निर्मिती होणारे साहित्य दैनंदिन जीवनात उपयोगात येणारी वस्तू खरेदी केली जाते त्यामध्ये अडकित्ता, चाकू, विळा,विलती, घुंगरमाळ, वाद्य, घुंगरू, काठ्या, पोळीपाट, बेलने, काठवट यांची खरेदी केली जाते. यात्रेकरुच्या करमणुकीसाठी आगासी पाळने, मौत का कुहा,सर्कस, गाढवाकडुन ओळख व भविष्य जाणून घेणे.ताडपत्रीचा मोठा बाजार,माकड ,कबुतर,कुत्र्याचे पिल्ले, अन्य जंगली प्राणी विक्री होते.सारंगधरच्या नंतर माळेगांव येथे घोड्याचा बाजार



भरतो २० ते २५ दिवस खरेदी विक्री होते.अनेक राजकियाचे शौकीन घोड्याच्या खरेदी विक्रीसाठी तंबु दाखल होतात.महिलाच्या सौंदर्यचे साधने,खेळणी,उबदारकपडे,माळेगावची मेंडराच्या केसांपासून बनवलेली प्रसिद्ध काठी घोंगडी,खरेदी विक्री होते. विविध साहित्य खरेदी विक्रीची दुकाने थाटून ग्रामीण उद्योगाला चालना देण्याचा या यात्रेतुन पर्यंत होतो. या यात्रेत ग्रामीण कारागीराच्या व्यावसायांना चालन मिळते वर्षभर कलाकुसर करुन ठेवलेले साहित्य यात्रेत विक्री केली जाते

माळेगाव यात्रेत आंबट शौकिनासह नवसे..गवसे.हावसे..यांचा मोठा कपिला दाखल होत आसतो.यात्रेत अनेक करमनुकिचे साधने आसतात त्यामध्ये मराठमोळी बॉम्बे डान्स पाहण्यात तरुणाई मशगुल आसते.माळेगाव यात्रेत ऑर्केस्ट्रा, पुण्याची मैना,झंकार ऑर्केस्ट्रा अनेक कलासंच दाखल होतात. जिल्हा परिषदेच्या वतीने सांस्कृतिक लावणी महोत्सवाचे आयोजन करण्यात येते . पंचायत समिती लोह्याच्या वतीने पारंपरिक कला महोत्सव,कुस्तीची दंगल,शंकरपटाचे आयोजीत करण्यात येते. आ.प्रताप चिखलीकर यांच्या मार्गदर्शनाखाली माळेगांव यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे.

यावर्षी यात्रेत तुडुंब गर्दी होण्याची दाट शक्यता आहे. माळेगाल येथे बैठक घेऊन यात्रा वाढीसाठी सर्वांचे सहकार्य आवश्यक आहे. असे जाहीर बैठकीत सांगीतले जर कोणी यात्रेच्या नियोजनात हालगर्जी केली तर त्या विभाग प्रमुखाची गया करणार नाही असे म्हणाले.यात्रा वाढीसाठी सर्वांनी पर्यंत करावे प्रतेक विभाग प्रमुखांनी यात्रेत उपस्थित राहावे भाविकांची गैरसोय तात्काळ टाळावी.

---

**संक्षिप्त वृत्त**

### वै.भाऊसाहेब देशपांडे यांच्या पुण्यस्मरणार्थ प्रा.डॉ.शंकर विभुते यांचे कथा कथन

**बाऱ्हाळी**-मुखेड तालुक्यातील बा-हाळी येथील वै.मार्तंडराव उर्फ भाऊसाहेब व्यंकटराव देशपांडे यांच्या सातव्या पुण्यस्मरणा निमित्त भाऊसाहेब



देशपांडे प्रतिष्ठानच्या वतीने विद्या विकास माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय येथे दिनांक २९ डिसेंबर रोजी रविवारी सकाळी १०.३० वा. नांदेड येथील सुप्रसिद्ध साहित्यिक व कथाकार प्रा.डॉ.शंकर विभुते यांचे कथा कथन आयोजित करण्यात आलेले आहे. प्रतिवर्षा प्रमाणे भाऊसाहेब देशपांडे प्रतिष्ठानच्या अध्यक्षा विजयाताई देशपांडे यांच्या वतीने विविध प्रकारचे सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, सांस्कृतिक व अध्यात्मिक उपक्रम राबवून पुण्यतिथी साजरी केली जाते. भाऊसाहेब देशपांडे यांचे सामाजिक, राजकीय, शैक्षणिक व कृषी क्षेत्रातील कार्य हे उल्लेखनीय असून त्यांच्या कार्याला उजाळा देण्याचे काम व त्यांचे विचार लोकापर्यंत पोहोच विण्यासाठी भाऊसाहेब देशपांडे प्रतिष्ठानच्या वतीने याही वर्षी २९ डिसेंबर रोजी सुप्रसिद्ध साहित्यिक व कथाकार प्रा. डॉ.शंकर विभुते यांचे कथाकथन हा कार्यक्रम आयोजित केलेला आहे. तरी या कार्यक्रमाचा लाभ बाऱ्हाळी व बाऱ्हाळी परिसरातील नागरिकांनी घ्यावा. असे आव्हान भाऊसाहेब देशपांडे प्रतिष्ठानच्या अध्यक्षा विजयाताई देशपांडे, मल्हारराव देशपांडे, ॲड.मुरारजी देशपांडे, राजन देशपांडे व परिवार, सचिव आरूण महाजन, नि.म.वडगावकर, विद्या विकास माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक उपमुख्याध्यापक व संपूर्ण कर्मचारी वृंद यांनी केले.

### मुदखेड येथे कॉंग्रेस पक्षाच्या वतीने डॉ. मनमोहन सिंग यांना श्रद्धांजली

**मुदखेड**-तालुका, शहर युवक कॉंग्रेसच्या वतीने दि. २८ डिसेंबर रोजी भारतचे माजी पंतप्रधान अर्थकारणाचा कणा डॉ. मनमोहन सिंग यांना कॉंग्रेस पक्ष कार्यालयात श्रद्धांजली शोक सभेचे आयोजन करण्यात आले होते. माजी पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंग यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुण ०२ मिनीटे मौन बाळगूण भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. श्रद्धांजली अर्पण करून यांच्या कार्यावर प्रकाश टाकण्यात आला. यावेळी तालूका कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष प्रताप देशमुख, शहराध्यक्ष कैलास गोडसे, जिल्हा सहसचिव हाजी मोहम्मद इलियास अब्बासी, जिल्हा सहसचिव गिरीष कोत्तावार, कार्याध्यक्ष मोहम्मद गौस, कॉंग्रेस संशोधन विभागाचे प्रदेक्षाध्यक्ष माधवराव हामंद,भोकर विधानसभा युवक कॉंग्रेसचे अध्यक्ष ज्ञानेश्वर पाटील मगरे , तालूका युवक कॉंग्रेसचे अध्यक्ष प्रशांत पाटील मूंगल,युवक कॉंग्रेसचे शहराध्यक्ष मुजीब पठाण, शहर सचिव अतीक अहेमद, अल्पसंख्याक शहराध्यक्ष एकबाल कुरैशी, सरपंच साहेबराव गोरकवाड, अविनाश चौंदते, संतोष चमकूरे, रमेश बोडके, वेदांत शेवटे, राधेश्याम पाटील ढगे, संजय बोकेफोड, आकाश सोनटक्के, यशवंत रणखांबे, कुलदीप मल्लेवार, लतीफ टेलर, जाकीर भाई, अतूल ढगे पाटील, कपिल बट्टेवार यांच्यासह आदींची उपस्थिती होती.

---

# भदंत टेकडी येथे भव्य बुद्धिमूर्तीचे आ. कोहळीकर यांचे हस्ते भूमिपूजन

**तभा वृत्तसेवा**
**हदगाव,दि. २८ डिसेंबर**

हदगाव शहरातील बौद्ध अनुयायांचे पवित्र स्थान असलेले भदंत टेकडी येथे भव्य असे तथागत गौतम बुद्ध यांच्या मूर्तीचे स्थानाचे भूमिपूजन हदगाव - हिमातनगर मतदारसंघाचे आ. बाबुराव कदम कोहळीकर यांच्या हस्ते पार पडले. या भूमिपूजनाच्या सोहळ्यास बौद्धजन महासंघती भिखुनी संघ संस्थापक पूज्य भदंत उप्पपु शासनक्रांती भदंत शासनपूर्णा महाथेरी, अनिल पा. बाभळीकर, विकास पा. देवसरकर, आबा वानखेडे, भास्कर वानखेडे, संदेश पा. हडसणीकर, बाबुराव काळे, बबन कदम, दादासाहेब शेळके, गुणवंत काळे, राष्ट्रपाल सावतकर, माधव वाढवे, सिंघम ढगे, संदीप दवणे, अनिल काळबांडे यांच्यासह परिसरातील बौद्ध उपासक - उपासिका यांच्यासह नागरिक



मोठ्या संख्येने उपस्थित होते.

भदंत टेकडी हा परिसर तब्बल १५ एकर जागेचा असून त्या ठिकाणी अनेक महापुरुषांच्या अर्धकृती पुतळे असून तालुक्यासह आजूबाजूच्या सीमेंतर्गतील नागरिक विपशनेसाठी येतात. त्याचधर्तीवर जगाला शांतीचा संदेश देणारे तथागत गौतम बुद्ध यांच्या भव्य दिव्य मूर्ती उभारली जाणार असून मूर्तीच्या पायाभरणीचा भूमिपूजन सोहळा आ. कोहळीकर यांच्या हस्ते पार पडले. लवकरच ही भव्यदिव्य बुद्धांची मूर्ती उभारली जाणार असून भदंत टेकडीच्या परिसराचे सुशोभीकरण ही लवकरच पूर्ण होणार अशी माहिती बौद्धजन महासंघती अध्यक्ष राष्ट्रपाल सावतकर यांनी दिली.

---

## अर्थसंकल्पिय अधिवेशनानंतर लाडक्या बहिणींना २१०० रुपये अनुदान : आ. केराम

**तभा वृत्तसेवा**
**किनवट,दि. २८ डिसेंबर**

निवडणुकीच्या काळात लाडक्या बहिणीने भारतीय जनता पक्षाला भरभरून मतदान रुपी आशीर्वाद दिले महायुती शासनाने लाडक्या बहिणीला दिलेल्या आश्वासनाप्रमाणे बजेट अधिवेशनानंतर लाडक्या बहिणीच्या खात्यात २१०० रु महिना यात्रमाणे अनुदान निश्चितपणे देणार आहोत.विरोधकांच्या कुठल्याही भूलथापांवर लाडक्या बहिणीने विश्वास ठेवू नयेअसे आवाहन आमदार भीमराव केराम यांनी दैनिक तरुण भारतसी बोलताना केले आहे.



गोरगरीब व आर्थिक दृष्ट्या दुर्बल असलेल्या कुटुंबीयांना आर्थिक स्थैर्य लाभावे या उद्देशाने महाराष्ट्र सरकारने विधानसभेच्या निवडणुकीपूर्वी मुख्यमंत्री माजी लाडकी बहीण ही महत्वकांक्षी योजना सुरू केली संपूर्ण राज्यात या योजनेची युद्ध स्तरावर अंमलबजावणी झाली लाडक्या बहिणीला दिलेल्या आश्वासनाप्रमाणे दरमहा पंधराशे रुपये याप्रमाणे त्यांच्या खात्यात अनुदान जमा केले जात आहे.लाडक्या बहिणीला दिलेले आश्वासन आम्ही पूर्ण केले त्यामुळे विधानसभा निवडणुकीत लाडक्या बहिणीनी आम्हाला भरभरून मतदानरुपी आशीर्वाद देऊन आमच्या हातात पुन्हा सत्तेची सूत्रे दिली आहेत आमच्या लाडक्या बहिणीच्या विश्वासाला आम्ही अजिबात तडा जाऊ देणार नाही मुंबई येथील बजेट अधिवेशनानंतर लाडक्या बहिणीला एकवीस रुपये दर महाप्रमाणे अनुदान दिले जाणार आहे. पण विरोधक या योजनेविरोधात अपप्रचार करून बहिणीची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करत आहेत. आमच्या लाडक्या बहिणीने त्या सावत्र भावावर अजिबात विश्वास ठेवु लाडक्या बहिणीच्या पाठीशी आम्ही नेहमीच खंबीरपणे उभे आहोत अशी ग्वाही आमदार भीमराव केराम यांनी दैनिक तरुण भारतसी बोलताना दिली आहे.

---



**किनवट**-सार्वजनिक बांधकाममंत्री नामदार रवींद्र चव्हाण हे सहकुटुंब श्रीक्षेत्र माहूरगड येथे आई रेणुका देवीच्या दर्शनासाठी आले असता भाजपा ओबीसी आघाडीचे जिल्हा सरचिटणीस रमेश बद्दीवार यांनी त्यांची सदिच्छा भेट घेऊन सत्कार केला. याप्रसंगी अनिल वाघमारे, कांताराव घोडेकर, नंदकुमार जोशी, नंदू कोपलवाड, अमोल पाटील व राहुल चव्हाण हे उपस्थित होते.

---

## जि. प. हायस्कूलच्या माजी विद्यार्थ्यांचे गेट टूगेदर

**तभा वृत्तसेवा**
**देगलुर,दि. २८ डिसेंबर**

शहापूर जिल्हा परिषद हायस्कूलमधील २००९-१० च्या बॅचच्या माजी विद्यार्थी विद्यार्थिनी पुन्हा एकदा एकत्र येत जुन्या आठवणींना उजाळा दिला. तब्बल १४ वर्षानंतर ७५ माजी विद्यार्थ्यांचा गेट टुगेदर नुकताच पार पडला. या मेळाव्यात ७०-७५ माजी विद्यार्थ्यांकडून शाळे मध्ये वृक्ष लागवड देखील करण्यात आले एवढेच नव्हे तर त्या वृक्षाची जबाबदारी देखील या बॅचने घेतली आहे.



**७०-७५ विद्यार्थ्यांचा सहभाग**

येत्या काही दिवसांत शहापूर शाळेतील काही गरीब व होतकरू विध्यार्थाना सर्व प्रकारचे शालेय साहित्य बॅचकडून देण्यात येणार आहेत.

शाळेतील माजी विद्यार्थी आज वेगवेगळ्या क्षेत्रात चांगल्या पदांवर कार्यरत आहेत. शासकीय, पत्रकार,उद्योजक तर कुणी व्यवसायिक क्षेत्रात वेगळा ठसा उमटवला आहे. अशा माजी विद्यार्थ्यांकडून सामाजिक बांधिलकी जोपासत शाळेत प्रति कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी वृक्ष लागवड,आर्थिक मदतीचा हात देण्याचा निर्णय यावेळी घेण्यात आला. त्यावेळी गुरुवर्य म्हणून संजय सिंग राजपूत ( मुख्याध्यापक ) आनंद रेनगुंटवार ( मुख्याध्यापक ) व कार्यक्रमाचे रूपरेषा व जबाबदारी म्हणून अमोल चिंतलवार ,प्रवीण सुरकुंटे, वसीम शहापूरकर ,शशांक शेषनगार, शिवदास भंडारे , राम ओसावार व सहकारी मित्रांचे मुलींचे देखील सहकार्य लाभले व त्यावेळी वर्गमित्र समितीतर्फे सर्वांचे आभार देखील मानण्यात आले.

---

# बारडच्या 'भाग्यविधाता किसान' समूहाची भरारी



**तभा वृत्तसेवा**
**मुदखेड,दि. २८ डिसेंबर**


बारडच्या भाग्यविधाता किसान समुहाने कृषी, वित्त, सहकार आणि सामाजिक क्षेत्रात भरारी घेत आता अर्बन नागरी सहकारी पतसंस्थेची मान्यता मिळविल्याने शेतकरी आणि सभासदांना आता कर्ज वाटप करण्याचा अधिकार प्राप्त झाला असून सर्व स्तरातून भाग्यविधाता किसान समूहाचे कौतुक होत आहे.

भाग्यविधाता किसानचे संयोजक डॉ. किरण देशमुख यांच्या संकल्पनेतून चारशे शेतकरी एकत्रित येत भागीदारीतून किसान केंद्राची उभारणी केली. शेतकऱ्यांना ना नफा ना तोटा या माध्यमातून दर्जेदार बी बियाणे खते, औषधे, अवजारे पुरविण्याचे केंद्र उभे केले. किसान केंद्राच्या माध्यमातून दरवर्षी मिळणाऱ्या व्यवसायाच्या नफ्यातून सभासद शेतकऱ्यांना गृहोपयोगी भेटवस्तू देण्याचा उपक्रमही रबविला जातो. प्रायोगिक तत्वावर फ्रुट कंपनी तसेच शासनामार्फत डाळ मिल उभारली आहे. यातून युवकांना रोजगाराची संधी उपलब्ध करून दिली.

भाग्यविधाता उद्योग समूहाने शेतकऱ्यांच्या संदर्भातील ठिबक अनुदान योजना, केळी पिकविमा, वजन काटा नियंत्रण, कमिशन इत्यादी निगडीत समस्या संदर्भात किसान केंद्राने प्रभावी काम केले आहे. भाग्यविधाता किसान समूहास आता अर्बन नागरी पतसंस्था म्हणून मान्यता मिळाली असून यामार्फत आता अल्पदरात किसान केंद्रातील सभासदांना तसेच छोट्या व्यवसायिकांना कर्ज पुरवठा करण्यात येणार असल्याचे पतसंस्थेचे संयोजक डॉ. किरण देशमुख यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले. कृषी क्षेत्रात भाग्यविधाता किसान समूहाने पारदर्शक कारभारातून शेतकऱ्यांचा विश्वास संपादित करत विकसित व उद्योगशील होण्याचा संकल्प केला असून डॉ. किरण देशमुख, शिवानंद पुयड, अनिल देशमुख, शिवाजीराव देशमुख, मनोज देशमुख, शरद देशमुख यांच्यासह आदींनी पुढाकार घेतला आहे.

---

### ई-केवायसी येत नसलेल्या लाभार्थ्यांना लाभ द्यावा



**धर्माबाद**-स्वस्त धान्यासाठी लाभार्थांना ई-केवायसी अनिवार्य करण्यात आले आहे. परंतू असंख्य लाभार्थ्यांचे अंगठे येत नसल्यामुळे त्यांना धान्यापासून वंचित राहावे लागत आहे. अशा लाभार्थ्यांना न्याय मिळून द्यावा अशी मागणी छावा संघटनचे तालूकाध्यक्ष शिवराज पाटिल चोळाखेकर यांनी केली आहे. स्वस्त धान्याबरोबरच शासनाकडून शेतकऱ्यांना शेतकरी योजनेतून दरमाह १५० रूपये मिळतात. परंतु या शेतकऱ्यांची देखील ई-केवायसी होत नसल्यामुळे यांना देखील अनुदानापासून वंचित राहावे लागत असल्याचे शिवराज पाटील चोळाखेकर यांनी नमुद केले आहे.

---



**नवीन नांदेड-बळीरामपुर येथे गोदावरी शेषराव वाघमारे यांच्या घरास आग लागल्याची माहीती मिळताच पोलिस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांनी घटना स्थळी जाऊन अग्निशमन दलाच्या मदतीने तात्काळ आगिवर नियंत्रण केले. तसेच लिकेज सिलेंडरवर देखील नियंत्रण केले.**

---

### मोया मोया या गंभीर मेंदू आजारावर यशोदा हॉस्पिटल सिंकदराबाद येथे यशस्वीरीत्या शस्त्रक्रिया

# न्युरोसर्जन डॉ.के.एस.किरण यांनी वाचविले ३७ वर्षीय महीला रुग्णाचे प्राण

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २८ डिसेंबर**

मेंदूचे अनेक प्रकारचे आजार आहेत यातीलच अतिगंभीर असा समजला जाणाऱ्या मोया मोया या आजारावर नांदेड येथील ३७ वर्षीय महीला रुग्ण सौ. निकीता बिरादार यांच्यावर यशोदा हॉस्पिटल सिंकदराबाद येथील प्रख्यात न्युरोसर्जन डॉ.के.एस.किरण यांनी मेडीकल मिरॅकल करत मेंदूच्या डाव्या व उजव्या आदी दोन्ही बाजूने यशस्वीरीत्या ब्रेन बायपास सर्जरी करीत मेंदूचा रक्तपुरवठा सुरळीत करून रग्णास जिवनदान दिले आहे त्याबद्दल रुग्ण सौ. निकीता व त्यांच्या कुंटूबियाच्या वतीने यशोदा हॉस्पिटलचे आभार मानन्यात आले आहेत

याविषयी पत्रकार परिषेदेत सविस्तर माहीती देतांना न्युरोसर्जन डॉ.के.एस.किरण यांनी सांगितले की , मोयामोया रोग हा एक दुर्मिळ, प्रगतीशील सेरेब्रोव्हस्कुलर डिसऑर्डर आहे जो बेसल गँग्लिया नावाच्या भागात मेंदूच्या पायथ्याशी ब्लॉक केलेल्या धमन्यांमुळे होतो. जपानी भाषेत मोयामोया म्हणजे धूराचा पफ आणि त्याचा उपयोग अडथळ्याची भरपाई करणाऱ्या लहान वाहिन्यांच्या गोंधळलेल्या स्वरूपाचे वर्णन करण्यासाठी केला जातो.

मोयामोया रोगाचे वर्णन प्रथम जपानमध्ये केले गेले होते आणि जगभरातील व्यक्तींमध्ये आढळते, जरी त्याचे प्रमाण युरोप किंवा उत्तर अमेरिकेपेक्षा आशियाई देशांमध्ये जास्त आहे. हा रोग प्रामुख्याने मुलांना



प्रभावित करतो, परंतु प्रौढांमध्ये देखील होऊ शकतो.


लहान मुलांमध्ये, मोयामोया रोगाचे पहिले लक्षण बहुतेक वेळा स्ट्रोक किंवा वारंवार ट्रान्झिएंट इस्केमिक अटॅक (टिआयएएस ) असते, ज्याला मिनी-स्ट्रोक देखील म्हणतात, ज्यांना वारंवार स्नायू कमकुवत किंवा शरीराच्या एका बाजूला प्रभावित करणारे पक्षाघात असतो. प्रौढांना देखील याचा अनुभव येऊ शकतो. ही लक्षणे अवरोधित धमन्यांमधून उद्भवतात, परंतु मेंदूमध्ये रक्तस्राव झाल्यामुळे रक्तस्रावाचा झटका येतो डोकेदुखी, चक्कर,विस्कळीत चेतना, अनैच्छिक हालचाली,दृष्टी समस्यादसंज्ञानात्मक आणि/किंवा संवेदनाक्षम कमजोरी यात सर्वसामान्यपणे लक्षणांचा समावेश असू शकतो.

**न्युरोसर्जरी क्षेत्रासाठीही आव्हानात्मक : ब्रेन बायपास सर्जरी**

या प्रकारच्या शस्त्रक्रिया अरुंद रक्तवाहिन्या उघडून किंवा अवरोधित धमन्यांना बायपास करून मेंदूमध्ये रक्त प्रवाह (रिव्हॅस्क्युलायझेशन) पुनर्संचयित करण्यासाठी असतात व त्या अंत्यत बारकाईने आणि काळजीपूर्वक पार पाडाव्या लागतात त्यामुळे रुग्णांना शस्त्रक्रियेशिवाय, मोयामोया रोग असलेल्या बहुसंख्य व्यक्तींना धमन्यांच्या प्रगतीशील संकुचिततेमुळे मानसिक चलबिचल आणि एकापेक्षा अधिक स्ट्रोकचा धोका कायम असतो. उपचाराशिवाय, इंट्रासेरेब्रल रक्तस्राव (मेंदूमध्ये रक्तस्राव) परिणाम म्हणून मोयामोया रोग घातक ठरू शकतो त्यामुळे सर्जरी गरजेची आहे.

---

# माकडांचा धुमाकूळ ; वयोवृद्ध महिला गंभीर जखमी



**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २८ डिसेंबर**

उमरी तालूक्यातील सोमठाणा हे गाव उमरी भोकर या रस्त्यावर असून या गावात मागील काही दिवसा पासून माकडांच्या कळपाणी धुमाकूळ घातला आहे. यामुळे गावातील नागरिक त्रस्त झाले असून याकडे भोकर वन विभागाचे मात्र दुर्लक्ष होत आहे. माकडाच्या टोळीच्या धुमाकूळ मुळे गावातील वयोवृद्ध महिला अनुसयाबाई नागनाथ हामदे वय ७५ वर्ष असून या महिलेचा पाठलाग माकडाने केल्यामुळे ती महिला गंभीर जखमी झाले असून यामध्ये त्यांच्या गुडघ्याला व छातीतील हाड टिचल्यामुळे गंभीर जखमी झाल्या आहे. यामुळे गावातील महिला, लहान बालके, वयोवृद्ध यांच्यात भीतीचे वातावरण निर्माण झाले. याकडे भोकर वनविभाग लक्ष घालून मोकाट गावात मुक्त संचार करणाऱ्या माकडांना आवर घालून जंगलात त्याना सोडतील काय ?याकडे गावकऱ्यांचे लक्ष लागले आहे .

सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat

# छत्रपती संभाजीनगर



## कत्तलखान्याकडे जाणारे गोवंश पोलिसांच्या ताब्यात

तभा वृत्तसेवा

कन्नड :दि.२८ डिसेंबर - शहरात रात्रीच्या वेळेस गस्त घालत असताना पोलिसांना गोवंश आढळून आले, तर यातील आरोपी गाडी सोडून फरार होण्यात यशस्वी झाला.

दि.२७ रोजी रात्री पोलीस उपनिरीक्षक के.एफ. जारवाल,पोलिस नाईक प्रवीण बर्डे, हे रात्रपाळी गस्त करत असताना उरूस मैदान, कन्नड येथे ३:३० वाजण्याच्या सुमारास गस्तीदरम्यान एक संशयित मालवाहू( पीकअप ) क्रमांक एम.एच ४५ ए.एफ.६७६० उभी असताना दिसली. त्या वाहनाची





तपासणी केली असता त्यात एक बैल , चार गायी जखडून ठेवलेल्या अवस्थेत आढळून आल्या मात्र वाहन चालक वाहन सोडून पळून जाण्यात यशस्वी झाला. सदरचे वाहन व गोवंश कन्नड शहर पोलीस ठाण्यात आणण्यात आले,

प्राण्याचा छळ प्रतिबंधक कायदा अन्वये अज्ञात व्यक्ती व वाहन क्रमांक एम.एच ४५ एएफ ६७६० विरोधात गुन्हा दाखल करून सदरची जप्त जनावरे सुरक्षिते साठी श्री गोशाळा , अंधानेर ता. कन्नड येथे ठेवण्यात आलेली असून अनोळखी आरोपीचा शोध सुरू असुन गुन्हाचा अधिक तपास सहाय्यक पोलिस निरीक्षक कुणाल सुर्यवंशी हे करत आहे.

**शहरातील नागरिक व प्राणी प्रेमींना पडलेले प्रश्न : आतापर्यंत याच ठिकाणी तीन वेळेस कारवाई होऊन प्रत्येक वेळेस वाहनचालक फरार कसा होतो,याच ठिकाणी कन्नड शहर पोलीस ठाण्या पासुन हाकेच्या अंतरावर असलेला कत्तलखान्यावर कारवाई कधी होणार तसेच फरार आरोपी कधी पकडणार असा प्रश्न नागरिकांना पडला आहे**

## सोयगावात चक्क रानडुक्करांचा कळप; पहाटे सहा वाजेची घटना

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.२८ डिसेंबर

सोयगाव शहरातील विविध भागात पाच ते सहा रानडुक्करांचा कळप शनिवारी पहाटे सहा वाजता बस स्थानकाच्या मागून सुसाट धावत पळत सुटल्याने नागरिक भयभीत झाले होते रात्री या रानडुक्करांचा कळपांनी सोयगाव शहरात मुक्काम केल्याची चर्चा आहे

शेत शिवारात मुक्तपणे संचार करणारी रानडुकरे चक्क शहरात आढळून आली आहे मात्र मानवी हस्तक्षेप वाढताच या कळपांनी पळ काढत सोना नदीच्या पात्रातून वेताळवाडी च्या जंगलात धूम ठोकली होती दरम्यान सोयगाव वनविभाग मात्र पहाटेच्या साखर झोपेत च होता वनविभाग चा एकही कर्मचारी घटनास्थळी फिरकला नव्हता पहाटे पहाटे फिरणाऱ्या ची संख्या वाढली आहे त्यामुळे या रानडुक्करांचे अनेकांना दर्शन घडले होते दरम्यान हिवाळ्याच्या दिवसात पहाटे फिरणाऱ्या ची संख्या अधिक असल्याने नागरिकांना भीती वाटत आहे त्यामुळे बंदोबस्त करावा अशी मागणी पुढे आली आहे

## फिजिशियन्स सादर करणार नृत्य आणि संगिताचा अविष्कार - फिजिशियन्स संघटनेचे आज स्नेहमिलन

छ. संभाजीनगर - रोजच्या तणाव आणि धकाधकीच्या आयुष्यातून वेळ काढून स्वताच्या आनंदासाठी आणि नागरिकांच्या मनोरंजनासाठी छ. संभाजीनगर फिजिशियन्स संघटनेच्या वतीने रविवार दि. २९ डिसेंबर रोजी रंगारंग कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे अशी माहिती संघटनेचे अध्यक्ष डॉ. संजय पाटणे यांनी दिली.

शहरात दोनशेच्यावर एम.डी. फिजिशियन्स संघटेने चे सभासद आहेत. दर दोन वर्षांनी संघटनेचे संमेलन आयोजित करण्यात येते. यावेळी संघटनेच्या पुढील वाटचाली संदर्भात चर्चा करण्यात येते. दि. २९ डिसेंबर रोजी तापडिया रंगमंदिरात सायंकाळी सात वाजता हा कार्यकम होणार आहे. ' रेट्रो ते मेट्रो ' या संकल्पनेवर आधरित विविध गुणदर्शनाचा कर्यक्रम सादर करण्यात येणार आहे. दररोजच्या व्यस्त दिनक्रमातून वेळ काढून आपापल्या कलाविष्काराची जोरदार तयारी डॉक्टर करत आहेत अशी माहिती सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. अजिंक्य देशमुख यांनी दिली.

प्रसिद्ध गायक लक्ष्मीकांत काळे यांच्या सूरसिंगार वाद्यवृंदाच्या साथीने यावर्षी प्रथमच फिजिशियन्स आपली कला सादर करणार आहेत. नृत्य, गायन, एकपात्री, नाट्यसंगीत असे विविध कलाप्रकार मंचावर सादर होतील. संघटनेच्या वतीने धन्वंतरी सांस्कृतिक सभागृह उभारत आहे. त्यासाठी डॉक्टरांच्या माध्यमातून निधी संकलन करण्यात येणार आहे अशी माहिती यावेळी संघटनेचे सचिव डॉ, अनंत कुलकर्णी यांनी दिली. कार्यक्रम सर्वांसाठी खुला आहे. जास्तीत जास्त नागरिकांनी कार्यक्रमाचा आनंद घ्यावा असे आवाहन संघटनेच्या वतीने करण्यात आले आहे.

पोलीस आयुक्तांच्या हस्ते उद्घाटन

दि. २९ डिसेंबर रोजी सायकली ७ वाजता पोलीस आयुक्त प्रवीण पवार यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन होणार आहे. सांस्कृतिक विभागाचे डॉ.अजिंक्य देशमुख,डॉ. वर्ष आपटे,डॉ.अंजली नाईक, डॉ. रंजना देशमुख, डॉ. अभय पोहेकर , डॉ. पोहरेगावकर, आदी कार्यक्रम यशवी करण्यासाठी परिश्रम घेत आहेत.

## शरीफा बी हबीब शेख यांचे निधन



बिडकीन दि २८ डिसेंबर शरीफा बी हबीब शेख वय ८७ रा म्हारोळा ता पैठण यांचे दि २६ रोजी दु:खद निधन झाले आहे यांची अंत्यविधी शुक्रवार रोजी दुपारी बारा वाजता म्हारोळा येथील कब्रस्तान येथे दफन विधी करण्यात आली त्यांच्या पश्चात चार मुलं, दोन मुली, सोना, जावई, नातवंड असा परिवार आहे, माजी उपसरपंच सलीम शेख त्यांच्या आई होत्या.

## पाटेगाव पुलाजवळ आढळला अनोळखी वयोवृद्ध महिलेचा मृतदेह

तभा वृत्तसेवा पैठण दि २८ :- पैठण शहरालगत असलेल्या पटेगाव पूल गोदावरी नदीत शनिवारी दुपारी अनोळखी वयोवृद्ध महिलेचा मृतदेह पाण्यात तरंगता आढळून आला असून पोलीस निरीक्षक संजय देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली मृत महिलेच्या ओळखीचा तसेच मरणाचा शोध घेतला जात आहे.

सदरील अनोळखी महिलेचे वय वर्ष अंदाजे ६० ते ६५ असून अंगावर चॉकलेटी रंगाचे फुलाची डिझाईन असलेले पातळ/लुगडे मोरपंखी रंगाचे ब्लाऊज ,केस पांढरे असे आहे. या महिलेस कोणी ओळखत असल्यास किंव्हा तिचे नातेवाईक यांचे बाबत काही माहिती असल्यास पैठण

पोलीस निरीक्षक संजय देशमुख मोबाईल क्रमांक ९८२३०९७१४६,उप पोलीस निरीक्षक दशरथ बुरकुल मोबाईल क्रमांक ९५५२५८४११५,पो. हे पुरी ८६६९१५७२३१ यांच्याशी संपर्क करावा.

## आर्य चाणक्य मध्ये गणित दिना निमित्त विविध उपक्रम

तभा वृत्तसेवा

पैठण दि २८ :- चाणक्य प्राथमिक विद्या मंदिर, पैठण येथे गणित दिनानिमित्त गणितीय सप्ताह चे आयोजन करण्यात आले होते.

२२ डिसेंबर हा दिवस श्रीनिवास रामानुजन यांच्या जयंती निमित्ताने गणित दिवस म्हणून साजरा केला जातो. गणित दिवसाचे औचित्य साधून गणितीय सप्ताह आयोजन आर्य चाणक्य प्राथमिक विद्यामंदिर येथे इयत्ता पाचवी ते सातवीच्या विद्यार्थ्यांसाठी गणित शैक्षणिक साहित्य प्रदर्शनी चे आयोजन करण्यात आले. यात एकूण १४५



विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या प्रदर्शनीच्या उद्घाटनासाठी शाळेचे शालेय समिती प्राथमिक विभागाचे अध्यक्ष शिवाजी मारवाडी,शालेय समितीचे सदस्य किशोर भाकरे मुख्याध्यापक भास्कर कुलकर्णी, प्रदर्शनीचे परीक्षक विकास भोसले, सारिका धोकटे, अपर्णा हरकारे हे उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी कोनांचे प्रकार, गणितावरील क्रिया, पूर्णांक संख्या, मॅथ पार्क, भौमितिक आकार इत्यादींवर आधारित आकर्षक शैक्षणिक साहित्य तयार केले. हे शैक्षणिक साहित्य पाहण्यासाठी शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना संधी देण्यात आली.

गणित दिवसाचे औचित्य साधून शाळेमध्ये गणित गती स्पर्धा व पाढे पाठांतर स्पर्धा घेण्यात आली.

गणित गती स्पर्धेत कमीत कमी वेळात जास्तीत जास्त अचूक उत्तरे लिहिणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रत्येक वर्गातून दोन क्रमांक काढण्यात आले.

पाढे पाठांतर स्पर्धेसाठी देखील विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यात विद्यार्थ्यांनी तबल १००पर्यंतचे पाढे म्हणून दाखवले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी गणित प्रमुख शुभांगी सदावर्ते ,राखी धोकटे व शाळेतील शिक्षकांनी परिश्रम घेतले.

## शहर सरचिटणीसपदी आकाश कुलथे



तभा वृत्तसेवा पैठण दि २८ :- भारतीय जनता पक्षाच्या युवा मोर्चा पैठण शहर सरचिटणीसपदी आकाश कुलथे यांची निवड करण्यात आली आहे. पक्ष विस्तार आढावा बैठकीत आकाश कुलथे यांची शहर सरचिटणीस या पदावर नियुक्ती करण्यात आली. भाजपा तालुकाध्यक्ष लक्ष्मण औटे, नगराध्यक्ष सुरज लोळगे, शहराध्यक्ष सिद्धार्थ परदेशी यांच्या हस्ते कुलथे यांना नियुक्तीपत्र देण्यात आले. यावेळी पक्षाचे विशाल पोहेकर,वैभव पोहेकर यांची उपस्थिती होती. या नियुक्ती बद्दल त्यांचे भाजपा पदाधिकारी आणि सदस्यांनी अभिनंदन केले आहे.

## माणुसकी वृध्दसेवालयाच्या नवीन वास्तूचे मान्यवरांच्या हस्ते आज उद्‌टन

### लक्ष्मी पंडित हिच्या वाढदिवसाचे औचित्य साधून भव्य रक्तदान शिबीराचे आयोजन

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.२८ डिसेंबर

सु-लक्ष्मी बहुउद्देशीय सेवाभावी संस्था संचालित माणुसकी वृद्ध सेवालयाच्या नूतन वस्तूचे उद्घाटन प्रसिद्ध मराठी सिनेअभिनेते मकरंद अनासपुरे यांचे हस्ते होणार आहे.तत्पूर्वी लक्ष्मी पंडित हिच्या वाढदिवसाचे औचित्य साधून भव्य रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे प्रमुख पाहुणे म्हणून मकरंद अनासपुरे सुप्रसिद्ध मराठी सिने अभिनेते व प्रकाशजी भागवत.सिने अभिनेते येड्याची जत्रा फेम,तथा हास्य कलाकार,

अप्पर पोलीस अधीक्षक संभाजीनगर ग्रामीण सुनिल लांजेवार,पोलीस निरीक्षक सुनिता मिसाळ, हर्सुल पोलीस स्टेशन,भारत सोनवणे (माजी अधिष्ठाता घाटी)हे उपस्थित राहणार आहेत.

शासकीय रुग्णालय घाटी येथे रक्ताचा तुटवडा असल्यामुळे छत्रपती संभाजीनगर शहरातील जास्तीत जास्त रक्तदात्यानी रक्तदानासाठी यावे असे आव्हान माणुसकी समुहातर्फे सुमित पंडित यांनी केले आले आहे. हा कार्यक्रम माणुसकी वृद्ध सेवालय येथे गट नंबर ४४ गावंदरी तांडा कामधेनू कॉलेजच्या समोर जटवाडा रोड छत्रपती संभाजीनगर येथे रविवारी दि.२९ रविवार रोजी सकाळी १० ते ०२:०० पर्यत रक्तदान शिबीराने सुरवात होईल.दुपारी ०२:१५ वा.

उपस्थित मान्यवरांच्या शुभहस्ते माणुसकी वृध्द सेवालयाचे उद्घाटन सोहळा पार पडेल.या कार्यक्रमासाठी माणुसकी समुहाच्या पाठीशी भक्कम उभे राहणार्या दात्यांनी आपणच दाखवलेल्या दातृत्वातून उभ्या राहिलेल्या वस्तूच्या उद्घाटन सोहळयाचे कौतुक पहाण्यासाठी उपस्थित राहावे ही विनंती माणुसकी समुहाच्या वतीने करण्यात आली आहे.

## संत संताजी जगनाडे महाराज पुण्यतिथी निमित्त अभिवादन

सिल्लोड (प्रतिनिधी) दि.२८ : थोर संत संताजी जगनाडे महाराज यांच्या पुण्यतिथी निमित्त सिल्लोड येथे अभिवादन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता . याप्रसंगी शिवसेना नेते ,माजी मंत्री, आ.अब्दुल सत्तार यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी शहरातील संत संताजी जगनाडे महाराज चौकात संत जगनाडे महाराज यांच्या प्रतिमेस आ. अब्दुल सत्तार यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

त्यासोबतच शहरातील शिवसेना भवन येथे देखील तालुका शिवसेनेच्या वतीने संत जगनाडे महाराज यांच्या पुण्यतिथी निमित्त अभिवादन कार्यक्रम घेण्यात आला. याप्रसंगी आ. अब्दुल



सत्तार यांच्या हस्ते संत संताजी जगनाडे महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी माजी नगराध्यक्षा श्रीमती राजश्री निकम, शिवसेना महिला आघाडीच्या दुर्गाबाई पवार, नॅशनल सहकारी सूतगिरणीचे संचालक शंकरराव खांडवे , विठ्ठल सपकाळ, राजेंद्र ठोंबरे, प्रशांत क्षीरसागर, रईस पठाण, तिळवण तेली समाज तालुकाध्यक्ष दादाराव पंडित, डॉ. मच्छिंद्र पाखरे, कृउबा समितीचे संचालक शेख जावेद, सयाजी वाघ , अब्दुल करीम, मानसिंग राजपूत ,अमर सिंग राजपूत, युवासेनेचे शिवा टोम्पे , दत्ता एंडोले, गणेश शेलार, संतोष खैरनार, गणेश चंदनचे, प्रवीण एंडोले, गजानन काकडे , फहीम पठाण ,सचिन पाखरे, संजय शिंदे, योगेश राऊत, मुकुंद चौधरी, अंकुश राऊत , सागर चंदनसे, रवी पवार, संदीप पाटील,रत्नाकर टोम्पे आदींची उपस्थिती होती.

## सिल्लोड येथील कैं. सुधाकर माने यांचे मरणोत्तर देहदान; जगद्गुरु नरेंद्राचार्य महाराज संस्थान तर्फे ७३ मरणोत्तर देहदान

सिल्लोड- जगद्रु रामानंदाचार्य श्री स्वामी नरेंद्राचार्यजी महाराज यांच्या प्रेरणेतून स्व. सुधाकर बंडु माने, सिल्लोड त्यांच्या इच्छेनुसार मरणोत्तर देहदान करण्यात आले. त्यांचा मृतदेह शासकीय वैद्यकीय महाविद्यालय छत्रपती संभाजीनगर येथे सुपुर्द करण्यात आला. जगदगुरू नरेंद्राचार्य महाराज संस्थानाच्या पुढाकारातुन हे ७३ वे देहदान आहे.

कै.सुधाकर बंडु माने ( वय ७३) मानेवाडी,दक्षिणमुखी हनुमान मंदिराजवळ सिल्लोड यांचे गुरुवार ( दि.२६) रोजी रात्री ८:४५ वा.निधन झाले. त्यांच्या



इच्छेनुसार मरणोत्तर देहदान करण्यात आले. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय छत्रपती संभाजीनगर येथे त्यांचा मृतदेह सुपुर्द करण्यात आला.जगदगुरु नरेंद्राचार्य महाराज संस्थानच्या पुढाकारातुन झालेले हे ७३ वे देहदान आहे तर छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील हे पाचवे मरणोत्तर देहदान आहे.

यावेळी पत्नी लताबाई सुधाकर माने,मुलगा कृष्णा सुधाकर माने,गोपाल सुधाकर माने,सुन वैशाली माने,बहिण मंगलबाई ढवळणे,मेव्हुने गणेश झोंड,केशव झोंड, ज्ञानेश्वर मालोदे,डॉक्टर वैभव झोंड,भुषण पाटिल,निकेश गरुड,श्रीराम काकडे,रवी माने,सुनिल धुततोंडे राहुल धुतोंडे, यांच्या सह स्व-स्वरुप संप्रदाय छत्रपती संभाजीनगर जिल्हा सेवा अध्यक्ष रघुनाथ शेळके,उप पीठ सिमुरगव्हान लेफ्टनंद रमेशदास वैष्णव, समाधान खेळवने, निर्मला तरटे, गणेश सांगळे,विनय अधाने,शुभम शिंदे,सुनिल गवळी,तुकाराम बोचरे , राहुल मोरे,संजय निकम,तारकताई सह आदी कार्यकर्ते उपस्थित होते.यावेळी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय छत्रपती संभाजीनगरचे सर्व डॉक्टर व सर्व कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.जगद्गुरु श्रींनी त्यांच्या संप्रदायाला मृत्युनंतरही देहदान करुन, समाजाच्या उपयोगी पडण्याचे आवाहान केले होते. त्याला मोठा प्रतिसाद मिळाला. तसे अर्ज भरुन संस्थान कडे दिले.त्यांनी ते संबंधित वैद्यकीय महाविद्यालयकडे सुपुर्द केले आहेत.त्यातील ७३ जणांनी आता पर्यंत मरणोत्तर देहदान केले आहे. गुरुंवरील निष्ठा आणि गुरुंवरील प्रेम यामुळेच जगद्गुरु श्रींचे अनुयायी मरणोत्तर देहदान करत आहेत.स्व- स्वरूप संप्रदायाचा वतिने भावपूर्ण पुष्पांजली अर्पण करण्यात आली.

## यंदाचा पद्मपाणी जीवनगौरव पुरस्कार ज्येष्ठ दिग्दर्शिका सई परांजपे यांना जाहीर

### दहाव्या अजिंठा वेरूळ आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात मान्यवरांच्या हस्ते होणार प्रदान

छत्रपती संभाजीनगर, दि.२८ : जगभरातील सर्वोत्कृष्ट चित्रपट मराठवाड्यातील रसिकांपर्यंत पोहोचवणार्या दहाव्या अजिंठा वेरूळ आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाची घोषणा करण्यात आलेली असून बुधवार, दि. १५ ते रविवार, दि. १९ जानेवारी २०२५ या दरम्यान हा महोत्सव छत्रपती संभाजीनगर येथे राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पातळीवरील कलावंताच्या मांदियाळीत संपन्न होणार आहे. या महोत्सवात भारतीय सिनेसृष्टीतील अतुलनीय योगदानाबद्दल दिला जाणारा पद्मपाणी जीवनगौरव पुरस्कार ज्येष्ठ चित्रपट दिग्दर्शिका, पटकथाकार, निर्मात्या, लेखिका व नाटककार पद्मभूषण सई परांजपे यांना जाहीर करण्यात आल्याची घोषणा महोत्सवाचे संस्थापक व संयोजन समितीचे अध्यक्ष नंदकिशोर कागलीवाल, प्रमुख मार्गदर्शक अंकुशराव कदम व महोत्सवाचे मानद अध्यक्ष आशुतोष गोवारीकर यांनी केली आहे. पद्मपाणी पुरस्कार निवड समितीने सई परांजपे यांच्या नावाची निवड केली असून या समितीच्या अध्यक्षपदी लतिका पाडगांवकर (पुणे) तर सदस्यपदी चित्रपट दिग्दर्शक आशुतोष गोवारीकर, सुनील सुकथनकर व चंद्रकांत कुलकर्णी यांचा समावेश होता. पुरस्काराचे स्वरूप पद्मपाणी सन्मानचिन्ह, सन्मानपत्र व दोन लक्ष रूपये असे आहे.

पद्मपाणी जीवनगौरव पुरस्काराचे वितरण मान्यवरांच्या हस्ते महोत्सवाच्या उद्घाटन सोहळ्यात बुधवार, दि. १५ जानेवारी २०२५ रोजी सायंकाळी ६ वाजता रूक्मीणी सभागृह, एमजीएम परिसर, छत्रपती संभाजीनगर येथे होणार आहे. तर महोत्सव पुढील पाच दिवस आयनॉक्स, प्रोझोन मॉल येथे संपन्न होणार आहे.

मागील चार दशकांहून अधिक काळापासून सई परांजपे या भारतीय सिनेजगतात कार्यरत असून त्यांनी दिग्दर्शित केलेल्या हिंदी सिनेमांनी भारतीय सिनेजगताला वेगळी ओळख प्राप्त करून दिली. अतिशय भावस्पर्शी, मानवी नातेसंबंधांवर भाष्य करणारे सिनेमे त्यांनी दिग्दर्शित केलेले आहेत. यामध्ये प्रामुख्याने स्पर्श (१९८०), चश्मेबद्दूर (१९८१), कथा (१९८३), दिशा (१९९०), चुडिया (१९९३), साज (१९९७) यांचा समावेश आहे. चित्रपट दिग्दर्शनासमवेत श्रीमती



परांजपे यांनी अनेक महत्वपूर्ण नाटकांचे व बालनाट्यांचे देखील दिग्दर्शन केलेले आहे. तसेच त्यांनी मराठी साहित्यात विपुल प्रमाणात लेखन केले असून प्रामुख्याने बालसाहित्याचा त्यात समावेश होतो. २००६ साली भारत सरकारने श्रीमती परांजपे यांना त्यांच्या या अतुलनीय योगदानासाठी पद्मभूषण पुरस्काराने गौरविले आहे. तसेच फिल्मफेअर पुरस्कार, महाराष्ट्र फाउंडेशनचा पुरस्कार अशा अनेक पुरस्कारांनी गौरविले आहे. चिल्ड्रन्स फिल्म सोसायटी या केंद्र शासनाच्या महत्वपूर्ण संस्थेवर देखील श्रीमती परांजपे यांनी सलग दोनदा अध्यक्ष म्हणून कार्य केले आहे.

नाथ ग्रुप, एमजीएम विद्यापीठ व यशवंतराव चव्हाण सेंटर प्रस्तुत व मराठवाडा आर्ट कल्चर व फिल्म फाउंडेशन आयोजित अजिंठा वेरूळ इंटरनॅशनल फिल्म फेस्टिव्हल हा केंद्रीय सुचना व प्रसारण मंत्रालय भारत सरकार, सांस्कृतिक कार्य विभाग महाराष्ट्र शासनाच्या सहकार्याने संपन्न होत असून प्रोझोन मॉल यांचे विशेष सहकार्य या फेस्टिव्हलला मिळालेले आहे. एनएफडीसी व महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी व सांस्कृतिक विकास महामंडळ, महाराष्ट्र शासन यांची सहप्रस्तुती असणार आहे. सॉलीटेअर टॉवर्स, अभ्युदय फाउंडेशन हे या महोत्सवाचे सह आयोजक आहेत. एमजीएम स्कूल ऑफ फिल्म आर्टस या महोत्सवाचे ॲकॅडमीक पार्टनर आहेत.

छत्रपती संभाजीनगरचे नाव चित्रपट क्षेत्रात जागतिक व्यासपीठावर नेणार्या या महोत्सवात मराठवाड्यातील नागरीकांनी सहभाग नोंदवावा, असे आवाहन संयोजन समितीचे अध्यक्ष नंदकिशोर कागलीवाल, प्रमुख मार्गदर्शक अंकुशराव कदम, मानद अध्यक्ष आशुतोष गोवारीकर, सतीश कागलीवाल, एमजीएम विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.विलास सपकाळ, महोत्सवाचे संचालक सुनील सुकथनकर, आर्टिस्टीक डायरेक्टर चंद्रकांत कुलकर्णी, महोत्सवाचे संयोजक नीलेश राऊत, क्रियेटिव्ह डायरेक्टर जयप्रद देसाई, ज्ञानेश झोटींग, शिव कदम, आकाश कागलीवाल, डॉ.अपर्णा कक्कड, डॉ.आशिष गाडेकर, डॉ.रेखा शेळके, प्रा.दासू वैद्य, डॉ. आनंद निकाळजे, प्रेरणा दळवी, सुबोध जाधव, अमित पाटील आदींनी केले आहे.